कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २४ डिसेंबर २०२४

किंमत ४ ₹

## विनोद कांबळीची प्रकृती खालावली

**ठाणे :** भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळीची प्रकृती खालावल्याने त्याला ठाण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बाळकुम येथील प्रगती हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यावर आवश्यक चाचण्या करण्यात आल्या असून क्रिकेटरवर सध्या आयसीयुत उपचार सुरु आहेत.किडनीशी संबंधित आजारामुळे लघवी इन्फेक्शनच्या समस्येनं क्रिकेटर त्रस्त आहे. याशिवाय ताप आणि डोकेदुखी यासारखी लक्षणंही त्याच्यात दिसून येत आहेत. शनिवारी रात्री माजी क्रिकेटरला पान २ वर

## शस्त्रांचा धाक दाखवून लुटले

**मुंबईः** डोळ्यात मिरचीची पुड फेकून, शस्त्रांचा धाक दाखवून रोख १० लाख रुपये लुटल्याची घटना गिरगाव परिसरात घडली. दोन संशयीत आरोपी तक्रारदार व त्याच्या सहकाऱ्याचा पाठलाग करीत होते, अशी माहिती सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणाच्या तपासणीत निष्पन्न झाली. याप्रकरणी व्ही. पी. रोड पोलिसांनी गुन्हा नोंदवून पळून गेलेल्या दोन्ही आरोपींचा शोध सुरू केला आहे. ही घटना गिरगाव येथील दुसरा पांजरापोळ, गुलालवाडी सर्कलमधील श्रीनाथ सहकारी सोसायटीमध्ये घडली. इंदरकुमार मोतीलाल पान २ वर

# डंपर चालकाने नऊ जणांना चिरडले, तिघांचा जागीच मृत्यू

| पुणे | वृत्तसंस्था |

पुण्यात भरधाव डंपरने फुटपाथवर झोपलेल्या नऊ जणांना चिरडल्याची घटना घडली आहे. या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. यात दोन चिमुकल्यांचाही समावेश आहे, तर सहा जण जखमी आहेत. जखमींमधील तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी कारवाई करत आरोपी डंपर चालकांला अटक केली आहे. गजानन तोटे असं डंपर चालकाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी गजानन तोटे भरधाव वेगात डंपर चालवत होता. याठिकाणी तीव्र उतार असल्याने त्याचे गाडीवरचे नियंत्रण सुटले आणि डंपर थेट फुटपाथवर गेल्याने हा अपघात घडला. यावेळी फुटपाथवर १२ जण झोपले होते. हे सर्वजण रविवारी अमरावतीहून पुण्यात कामासाठी आले होते. यावेळी भरघाव डंपर सरळ त्यांच्या अंगावर गेला. यात





■ डंपर चालक अटकेत

■ सहा जण जखमी

वैभवी रितेश पवार (१ वर्षे), वैभव रितेश पवार (२ वर्षे) रीनेश नितेश पवार (३० वर्षे) या तिघांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. दरम्यान, या अपघातात जखमी झालेल्यांना पुण्यातील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. यापैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. याप्रकरणी पोलिसांनी डंपर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून त्याची चौकशी सुरु असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे. जानकी दिनेश पवार, रिनिशा विनोद पवार १८ वर्षे, रोशन शशादू भोसले, ९ वर्षे, नगेश निवृत्ती पवार २७ वर्षे , दर्शन संजय वैराळ १८, आलिशा विनोद पवार ४७ वर्षे हे सहा जण जखमी झाले आहेत. आरोपी डंपर चालक गजानन शंकर तोटे याला ताब्यात घेतला असून मेडिकल करण्यासाठी रुग्णालयात नेले आहे. त्यांच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर जखमींना प्राथमिक उपचार आयनॉक्स हॉस्पिटल येथे करून ससून रुग्णालयात रवाना केले आहे. मृतदेह आयनॉक्स हॉस्पिटलमधून ससून येथे पाठवले आहेत.

# 22 हजार शेतकऱ्यांना 9 कोटींची प्रतीक्षा

**नुकसान भरपाईचा प्रस्ताव लालफितीत**

**अवेळी पावसात करोडोची हानी**

प्रमोद जाधव

| अलिबाग |

रायगड जिल्ह्यामध्ये ऑक्टोबरमध्ये अवेळी पाऊस पडला. या पावसात जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील ६ हजार ७३८ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. त्यामध्ये ६ हजार ७३० हेक्टर भातपीक व ८.३७ हेक्टर नागली (नाचणी) पिकाचे नुकसान झाले. या अवेळी पावसात ९ कोटी ३६ लाख रुपयांची हानी झाली आहे. परिणामी, २२ हजार २८४ शेतकऱ्यांना भरपाईची प्रतिक्षा लागून राहिली आहे. भरपाई मिळावी यासाठी जिल्हा प्रशासनाकडून शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. परंतु तो प्रस्ताव अजूनही लालफितीत अडकून असल्याची माहिती समोर येत आहे.




| तालुके | बाधित गावे | बाधित क्षेत्र (हेक्टर) | नुकसानग्रस्त शेतकरी |
|---|---|---|---|
| पेण | ५२ | ५१५.६६ | १३३६ |
| मुरूड | ०७ | ९.६६ | ३९ |
| खालापूर | ११५ | ५९५.९१ | १६३७ |
| कर्जत | २०६ | २२३७.६६ | ५७७९ |
| पनवेल | ६३ | १०४.१७ | ३३१ |
| माणगांव | २०६ | ११६०.५६ | ४३५२ |
| तळा | ४० | ९४.८० | ४०४ |
| रोहा | १८५ | २७५.०८ | १२७५ |
| सुधागड | ७७ | १९५.१४ | ७९६ |
| महाड | १७९ | ११७०.५६ | ४७७६ |
| पोलादपूर | ९३ | ३२४.३१ | १३७७ |
| म्हसळा | ३७ | ५२.४८ | १६८ |
| श्रीवर्धन | ११ | २.३९ | १४ |
| एकूण | १२७१ | ६७३८.३८ | २२२८४ |

जिल्ह्यामध्ये यंदा पाऊस समाधानकारक पडला. परंतु जूलैमध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये भात पिकाचे प्रचंड नुकसान झाले. या संकटातून शेतकरी सावऱ्याचा प्रयत्न करीत असताना जिल्ह्यात अवेळी पावसामुळेदेखील शेतकऱ्यांची मोठी हानी झाली. रायगड जिल्ह्यात १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत अवेळी पावसामुळे पेण, मूरूड, खालापूर, कर्जत,

### माणगांवमध्ये सर्वाधिक गावे

**रायगड जिल्ह्यातील १३ तालुक्यातील शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाई मिळाली नाही. प्रशासनाने दिलेल्या आकडेवारीनूसार, माणगाव तालुक्यात सर्वाधिक २०६ बाधित गावे असल्याचे माहिती समोर आली आहे. यावरुन अवेळी पावसाचा फटका सर्वाधिक माणगांवकरांना बसला असल्याचेही यावरुन स्पष्ट होते.**

पनवेल, उरण, माणगांव, तळा, रोहा, सुधागड पाली, महाड पोलादपूर, म्हसळा व श्रीवर्धन या १३ तालुक्यातील १ हजार २७३ गावांमधील २२ हजार २८६ शेतकऱ्यांच्या भात व नागली पिकांमधील ६ हजार ७३८ हेक्टर क्षेत्राचे ३३ टक्केपेक्षा अधिक नुकसान झाले.

या नुकसानीचा अहवाल तालुका कृषी अधिकारी, तहसीलदार, व गटविकास अधिकारी यांच्या संयुक्त पान २ वर

## बोगस प्रदूषण अधिकाऱ्यांपासून सावधान

**एमपीसीबीच्या संकेतस्थळावर कारखाना मालकांना इशारा**

| पनवेल ग्रामीण | वार्ताहर |

प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सल्लागार असल्याचे सांगत भामटे कारखानदारांची फसवणूक करत असल्याचे लक्षात आल्याने प्रदुषण मंडळाच्या संकेतस्थळावर अशा भामट्यांविरोधात तक्रार करण्याची सूचना करण्यात आली आहे.

रासायनिक कारखान्यांमधून होणाऱ्या प्रदूषणाचा मुद्दा गाजत आहे. तळोजा औद्योगिक परिसरातुन देखील होत असलेल्या प्रदुषणामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. प्रदूषणाविरोधात जनता संतप्त आहे. अशा परस्थितीचा फायदा घेण्यासाठी काही ठग सरसावले आहेत.

प्रदुषण मंडळाच्या सल्लागार पदावर नियुक्ती झाली आहे. त्यामुळे आपल्या कारखान्यातून होणाऱ्या प्रदूषणाची तपासणी करण्याची आणि प्रदूषणावर लक्ष ठेवण्याची जवाबदारी आमच्यावर असल्याची माहिती भामटे कारखानदारांना देत त्यांची फसवणूक ठग करीत आहेत. अशात भामट्यांपासून कारखानदारांनी सावध राहावे यासाठी केंद्रीय प्रदुषण महामंडळाकडून महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने देखील आपल्या संकेतस्थळावर नोटीसद्वारे आवाहन करण्यात आले आहे.

> "महाराष्ट्रात प्रदुषण मंडळाच्या नावावर सहसा असे प्रकार घडत नाहीत. मात्र केंद्रीय प्रदुषण मंडळाच्या नावावर इतर राज्यात असे प्रकार घडत असल्याने केंद्रीय प्रदुषण मंडळाने सर्वच राज्यातील प्रदुषण मंडळाना आपल्या संकेतस्थळावर सावधानतेचा इशारा देण्याच्या सूचना केल्यामुळे एमपीसीबीच्या संकेतस्थळावर हा इशारा दिसत आहे.
> – विक्रांत भालेराव, अधिकारी. एमपीसीबी"

**तळोजा औद्योगिक वसाहती असलेल्या रसायनिक कारखान्यानमधून प्रदूषण होत असल्याची तक्रार करत अनेक स्वयंभू पत्रकार आणि समाजसेवक कारखानदारांना वेठीस धरत असल्याचे अनेकदा स्पष्ट झाले आहे. अशा वेळेस कारखानदारांनी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या संकेतस्थळावर अथवा दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन एमपीसीबीकडून करण्यात आले आहे.**

### वेधक

## चार बांगलादेशीय नागरीक ताब्यात

**पनवेल :** कोपरा गावातील भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या चार बांगलादेशीय नागरीकांना नवी मुंबई पोलीस दलाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पोलिसांनी शनिवारी ताब्यात घेतले. खारघर पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. कोपरा गावातील संजय ठाकूर यांच्या खोलीमध्ये भाड्याने बांगलादेशातील नागरिक राहत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना मिळाल्यानंतर खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक पान २ वर

## कुरुळ रस्त्यावर भरदिवसा जीवघेणा हल्ला

**पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल**

| अलिबाग | प्रतिनिधी |

पालव ते अलिबाग असा कारने प्रवास करीत असताना एका अज्ञाताने अलिबागमधील चारचाकी वाहनावर हल्ला करीत गाडीचे नुकसान केले. मागून येऊन दुसऱ्याने कार चालकाच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून लंपास केली. ही घटना कुरुळ येथे रस्त्यावर सायंकाळी घडली. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात दोन अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महेश पाटील असे या तक्रारदाराचे नाव आहे. ते अलिबाग तालुक्यातील तळवली येथील रहिवासी आहेत. रविवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास महेश पाटील तळवली येथून पालव येथे हळदी समारंभासाठी आपल्या कारमध्ये गेले होते. हळदी समारंभाचा कार्यक्रम पूर्ण झाल्यावर त्महेश पाटील त्यांच्या कारमधून सायंकाळी ते तळवली येथील आपल्या घरी निघाले. सुमारे सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास महेश पाटील आपल्या कारमधून कुरुळ येथे सतीदेवी मंदिरासमोर आल्यावर एका अज्ञाताने ट्रक आडवा घालून महेश पाटील यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पुन्हा ट्रकद्वारे महेश पाटील यांच्या कारचा पाठलाग केला.

कुरुळ-अलिबाग रस्त्यावरील चिद्बादेवी मंदिराच्या पुढे आल्यावर एका अज्ञाताने दुचाकीवर येऊन महेश पाटील यांची गाडी थांबवली. त्याने महेश पाटील यांच्या गाडीचे नुकसान केले. त्यानंतर महेश पाटील यांचा पाठलाग करणाऱ्या ट्रक चालकाने मागून येऊन महेश पाटील यांच्या गळ्यातील सोन्याची चेन लंपास केली. याबाबतची तक्रार येऊन यांनी केली आहे.


याप्रकरणी दोन अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल केला असून यामध्ये सुमारे ७० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची नोंदही करण्यात आली आहे.

या गुन्ह्याचा तपास सहाय्यक फौजदार प्रतिक पाटील करीत आहेत. भर दिवसात वर्दळीच्या ठिकाणी अज्ञातांकडून झालेल्या जीवघेणा हल्ल्याबरोबरच चोरीच्या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे. भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. हल्ला करणाऱ्यांविरोधात पोलीस काय कारवाई करणार, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

# बडोदा-मुंबई प्रवास होणार सुसाट

| पनवेल | प्रतिनिधी |

बडोदा-मुंबई महामार्गाच्या शेवटच्या पॅकेजमधील माथेरान डोंगर रांगांखालील शिरवली गावालगतचा पहिल्या बोगद्याचे खोदकाम ऑगस्ट महिन्यात आरपार झाल्यानंतर दूसरा बोगद्याचे खोदकाम कधी पूर्ण होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. सध्या दुसऱ्या बोगद्याचे खोदकाम आरपार झाले असून जुलै २०२५ पर्यंत हे काम पूर्ण करण्याच्या जोरदार हालचाली प्राधिकरणाकडून सुरु आहेत. या दुहेरी बोगद्यामुळे आणि प्रशस्त महामार्गामुळे काही मिनिटांत बदलापूर येथील नागरिकांना पनवेल, उरण जेएनपीटी बंदरामध्ये आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पापर्यंत पोहचता येणार आहे.




सिडकोची दक्षिण नवी मुंबई म्हणजेच नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्राला दिल्लीशी जोडणाऱ्या मुंबई-बडोदा या महामार्गामुळे पनवेलचे अर्थकारण बदलणार आहे. पान २ वर

### विरार-अलिबागचे भूसंपादन रखडलेले

बडोदा-मुंबई महामार्गाचे पॅकेज क्रमांक १७ चे बांधकाम पुढील ९ महिन्यात पुर्ण करण्यासाठी जोरदार प्रयत्न सूरू आहेत. मात्र या पॅकेजनंतर हा महामार्ग विरार –अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेला पनवेलच्या मोरबे गावाजवळ जोडला जाणार आहे. विरार–अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेसाठी निधीची अडचण निर्माण झाल्याने या महाम र्गासाठी भूसंपादनाचा मोबदला एमएसआरडीसी पनवेलच्या शेतकऱ्यांना देऊ शकली नाही. त्यामुळे भूसंपादनच रखडल्याने विरार–अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेच्या बांधकामाविषयी साशंकता निर्माण झाली आहे.

### पाच वर्षात कौटुंबिक वादाची ४७८ प्रकरणे निकाली

# भरोसा सेलचा पीडितांना आधार

| अलिबाग | प्रतिनिधी |

विविध अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांना पोलिस मदत, महिला हेल्पलाइन, समुपदेशन, वैद्यकीय सेवा अशा अनेक सेवेच्या माध्यमातून मानसिक बळ देण्यासाठी रायगड जिल्ह्यात भरोसा सेल सुरु करण्यात आले आहे. पाच वर्षात कौटुंबिक वादाची ४७८ प्रकरणे निकाली काढण्यास भरोसा सेलला यश आले आहे. त्यामुळे भरोसा सेल पीडितांना आधार बनल्याचे चित्र आहे.

कौटुंबिक वादामुळे अनेक महिलांचे लैंगिक, मानसिक व आर्थिक स्वरुपाचे शोषण होते. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने अनेकवेळा पीडितांचे खच्चीकरण होते. वेळप्रसंगी पिडीत आत्महत्या करून आपले जीवन संपविण्याचा मार्ग स्वीकारतात.महिला समाजात सक्षमपणे उभ्या राहिल्या पाहिजे. त्यांना अत्याचाराविरोधात लढण्यासाठी बळ मिळावे म्हणून रायगड जिल्ह्यात ९ मार्च २०२० मध्ये भरोसा सेलची स्थापना करण्यात आली. या कक्षामध्ये दोन अधिकारी व सहा पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भरोसा सेलच्या कार्यालयात



दाखल झालेल्या तक्रारींचे निरसन करण्याचे काम वेगवेगळ्या पध्दतीने केला जाते. त्यामध्ये पोलिस मदत, महिला हेल्पलाईन, समुपदेशन, वैद्यकीय सेवा, मानसोपचार तज्ज्ञ, विधीविषयक सेवा, पीडित महिलांचे पुनर्वसन, कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत संरक्षण आदी सोयी सुविधांचा त

**दाखल झालेल्या कौटुंबिक वादाच्या प्रकरणांवर दृष्टीक्षेप**

| वर्षे | प्राप्त तक्रारी अर्ज | निकाली लावलेले अर्ज |
|---|---|---|
| २०२० | ५० | ५० |
| २०२१ | १०५ | १०५ |
| २०२२ | ११४ | ११४ |
| २०२३ | १३४ | १३४ |
| २०२४ | ९५ | ७५ |
| एकूण | ४९८ | ४७८ |

समावेश आहे.

वेगवेगळ्या स्तरावर या प्रकरणांचा निपटारा करण्याचा प्रयत्न केला जातो. जिल्ह्यामध्ये पाच वर्षापुर्वी सुरु झालेल्या भरोसा सेलला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.सुरुवातीला ५० तक्रारी दाखल झाल्या होत्या. हळूहळू तक्रारीत वाढ झाली. या तक्रारी सोडविण्याचा प्रयत्न कायमच सेलच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात आली आहे. पाच वर्षामध्ये ४९८ प्रकरणे या कार्यालयात दाखल झाले. यापैकी ४७८ प्रकरणांचा निपटारा करीत पीडितांना न्याय देण्याचा प्रयत्न भरोसा सेलच्या माध्यमातून करण्यात आला आहे. २०२० पासून ते २०२३ पर्यंत दाखल झालेले सर्वच प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे. २०२४ मध्ये दाखल झालेल्या ९५ तक्रारी अर्जापैंकी ७५ अर्ज निकाली काढले असून २० प्रकरणे प्रलंबित आहेत. ही लवकरच निकाली काढली जाणार असल्याची माहिती पोलीस दलाकडून देण्यात आली आहे.

**भरोसा सेल येथे सर्व विभाग एकत्र असल्यामुळे पीडितेला सर्व सेवा आणि मदत एकाच छताखाली मिळते आणि एखादा तक्रारींचे निराकरण झाल्यानंतर देखील तक्रारदाराचा पाठपुरावा केला जातो. जेणेकरून त्याला भविष्यामध्ये कोणत्या समस्या निर्माण होणार नाही.**

## पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करण्याचं धोरण रद्द

**केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा निर्णय**

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |


शिक्षण क्षेत्रात टीकेचा विषय ठरलेला पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करून पुढच्या इयत्तेत प्रवेश देण्याचं धोरण केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने अखेर रद्द केलं आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नो डिटेंशन पॉलिसी संपुष्टात आणली आहे. त्यामुळे आता पाचवी ते आठवीच्या वार्षिक परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुतीर्ण करण्यात येणार आहे. तसेच या विद्यार्थ्यांना दोन महिन्यांच्या आत पुन्हा परीक्षा देता येणार आहे. मात्र पुन्हा अनुतीर्ण झाल्यास या विद्यार्थ्यांना पुढच्या इयत्तेत प्रवेश मिळणार नाही. तसेच कुठल्याही शाळेला इयत्ता आठवीपर्यंतच्या कुठल्याही विद्यार्थ्याला शाळेतून काढून टाकता येणार नाही.

सोमवारी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नो डिटेंशन पॉलिसी संपुष्टात आणत दीर्घकाळापासून सुरू असलेली व्यवस्था बदलली आहे. या निर्णयामुळे आता पाचवी ते आठवीच्या वार्षिक परीक्षेत अनुतीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना नापास केलं जाणार आहे. मुलांमधील शिकण्याची क्षमता सुधारणे आणि शैक्षणिक कामगिरी उंचावणे हे हा निर्णय घेण्यामागचं महत्त्वाचं उद्दिष्ट असल्याचं सरकारने सांगितलं आहे. आता नव्या व्यवस्थेनुसार अनुतीर्ण विद्यार्थ्यांना दोन महिन्यांच्या आत पुन्हा परीक्षा देण्याची पान २ वर

# महावितरणसोबत संघर्षाची भूमिका

## पोलादपूरकरांच्या उदासिनतेमुळे 'रेड्यांच्या झोंबी'चा जालीम उपाय





**। पोलादपूर । वार्ताहर ।**

तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये विद्युतग्राहक जनतेला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नी आपली माती आपली माणसं सामाजिक संघटनेमार्फत महावितरणसोबत तीव्र संघर्षाची भुमिका घेण्यात आली असूनही पोलादपूरकर जनतेकडून या भूमिकेसंदर्भात उदासिनता दर्शविण्यात आल्याने पोलादपूरकर स्वत:च्या समस्यांऐवजी केवळ रेड्यांच्या झोंब्यांसाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहतात या पूर्वानुभवावरून सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राज पार्टे आणि अध्यक्ष निलेश कोळसकर यांनी महावितरणकडून विविध प्रश्नी महिनाभरात समस्या निवारण न झाल्यास रेड्यांच्या झोंब्यांचा जालीम उपाय करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

पोलादपूर तालुक्यातील माजी सभापती संभाजी साळुंखे, लोहारेचे माजी सरपंच किसन पारकर, संजय उतेकर, अर्जून पार्टे, भगवान पार्टे, गणपत उतेकर, दर्पण दरेकर, ओंकार मोहिरे यांच्यासह असंख्य पोलादपूरकरांनी आपली माती आपली माणसं सामाजिक संघटनेच्या आवाहनानुसार पोलादपूर येथील महावितरण कार्यालयामध्ये उपस्थित राहून विविध समस्यांचा आढावा महावितरणचे अभियंते चोरमाळे, पाटील, महाडीक, चव्हाण आणि कदम यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यामध्ये खराब विद्युतमीटर तातडीने बदलणे, बंद घरांची विजबिले किमान असावीत, बिले वेळेवर न मिळाल्यास दंडात्मक कारवाईचा भुर्दंड बंद व्हावा, अवाढव्य बिलांबाबत आधी भरा मगच दाद मागा ही भूमिका बंद व्हावी, नवीन विद्युतमीटरसाठी ८ हजार रूपयांची मागणी केली जाते, सिमेंटचे पोल आणि लोखंडी पोल आवश्यक तिथे बदलण्याची गरज आहे. गंजलेले विजेचे पोल तातडीने बदलावे, कर्मचारी व अधिकाऱ्यांची वागणूक व्यवस्थित असावी, अशा अन्य मागण्यांसाठी महावितरणच्या उपकार्यकारी अभियंत्यांना आपली माती आपली माणसं सामाजिक संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी धारेवर धरले.

आपली माती आपली माणसं सामाजिक संघटनेने महावितरण कार्यालयामध्ये चर्चेसाठी बोलविण्यात आल्यानंतर सोशल मिडीया आणि मोबाईलवरून संपर्क साधून अनेक समाजधुरिण तसेच राजकीय व्यक्तींना पोलादपूरकर जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

संघटनेच्या कार्यकर्त्यांव्यतिरिक्त कोणीही स्वारस्य न दाखविल्याने तालुक्यातील जनता रेड्यांच्या झोंबीला रात्रीपासूनच उपस्थित राहात असल्याने महावितरणने प्रश्न न सोडविल्यास रेड्यांच्या झोंबीचे आयोजन करून जनतेला उपस्थित राहण्याचे आवाहन करू, असा पवित्रा संघटनेचे संस्थापक राज पार्टे यांनी पोलादपूरकर जनतेच्या उदासिनतेवर जोरदार प्रहार केला आहे.

# जाणीव सामाजिक सेवाभावी संस्था द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मानित




**। उरण । प्रतिनिधी ।**

द्रोणागिरी स्पोर्टस असोसिएशनच्या २४ व्या रायगड जिल्हास्तरिय युवा महोत्सव निमित्त जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनिय केलेल्या कार्याबद्दल विविध संस्था, संघटनाना, विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना द्रोणागिरी भूषण पुरस्कार देण्यात आले.

यावर्षी ३६ द्रोणागिरी भूषण पुरस्कार प्रमुख उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान केले. त्यामधे उलवे येथील १० वर्ष समाजसेवेत कार्यरत असलेली जाणीव सामाजिक सेवाभावी संस्थेला द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत आणि माजी आमदार मनोहर भोईर यांच्या शुभहस्ते द्रोणागिरी भूषण पुरस्कार २०२४ देवून गौरविण्यात आले.

जाणीव संस्था ही रायगड जिल्ह्यातील १ली अंगणवाडी डिजिटल करणारी संस्था आहे. आत्ता पर्यंत ३ अंगणवाड्या डिजिटल केल्या. शिवाय अनेक आदिवासी पाड्यातील अंगणवाडीमध्ये विविध सामाजिक शैक्षणिक उपक्रम राबविले.

५० हून अधिक आदिवासी वाडीतील मराठी शाळेतील गरिब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश, क्रीडा साहित्य वाटप संस्थेमार्फत केले आहेत. अनेक आदिवासी वाड्यांमध्ये जीवनावश्यक वस्तूंचे वाटप त्याचप्रमाणे गेल्या १० वर्षापासून दरवर्षी हिवाळ्यात आदिवासी वाड्यांमधे ब्लँकेट वाटपाचे कार्यक्रम राबवत असते.

गेल्या पाच वर्षापासून प्रत्येक सेवाभावी कार्यक्रमात किमान एक देशी वृक्षरोप लागवड करते. अशा अनेक विविध सामाजिक सेवाभावी कार्य करणाऱ्या या संस्थेला आत्तापर्यंत शिवराज्य एकता युवा मंडळ पारगावकडून सन्मानित केले गेले. श्री गजानन महाराज मंदिर सेवा ट्रस्ट नेरेकडून समाजभूषण पुरस्कारानं सन्मानित तर महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान पाणदिवे यांच्यावतीने समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# माथेरानमध्ये पोहचले उल्हास नदीचे पाणी

### जुन्या पंप हाऊसमुळे अडचणी कायम



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या पर्यटन स्थळी नेरळ जवळील कुंभे येथील उल्हास नदीवरून तसेच माथेरान शहरातील शार्लोट लेकमधून पाणी पुरवठा केला जातो. मात्र नेरळ जवळील कुंभे येथील उल्हास नदीवरून उचलले जाणारे पाणी त्या मार्गावरील पंप हाऊसमधील बिघाडामुळे उल्हास नदीवरून जाणारा पाणी पुरवठा सात डिसेंबर पासून बंद होता.

दरम्यान,अखेर सतराव्या दिवशी उल्हास नदीवरून माथेरान साठी पाणी उचलणे सुरु झाले आहे.त्यामुळे सध्या सुरु असलेल्या पर्यटन हंगामातील पाण्याचा प्रश्न निकाली निघाला आहे.

माथेरान शहराला पाणी पुरवठा करणारा उल्हास नदीवरील पाणी पुरवठा पंप हाऊसमधील बिघाडामुळे सात डिसेंबरपासून बंद झाला होता. उल्हास नदीवरील कुंभे गावातून पाणी उचलून नेरळ माथेरान घाटरस्ता मार्गे माथेरान शहरात पोहचवले जाते.

या मार्गात घाटरस्ता असल्याने कुंभे ते माथेरान या दरम्यान जुम्मापट्टी आणि वॉटर पाईप या ठिकाणी स्वतंत्र पंप हाऊस उभे केले जाते.त्या तिन्ही ठिकाणच्या पंप हाऊसमध्ये बिघाड झाले आणि सात डिसेंबर पासून उल्हास नदीवरील पाणी पुरवठा यंत्रणा बंद पडली.

त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून कार्यकारी अभियानात, उप अभियानात,सहायक अभियानात आणि मेंटेनन्स विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडून माथेरान प्रादेशिक नळपाणी योजणेच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न सुरु झाला.

मात्र तब्बल सतरा दिवसांनी माथेरान शहराला पुन्हा एकदा उल्हास नदी वरून पाणी उचलणे सुरु झाले आहे.त्यामुळे गेली सोळा दिवस माथेरान शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या शार्लोट लेक वरील पाणी पुरवठ्याचे संकट दूर झाले आहे.

याबाबत जीवन प्राधिकरणाचे उप अभियंता माधवी गरुड यांनी या काळात नळपाणी योजना पुन्हा कार्यन्वित होण्यासाठी कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांच्या माध्यमातून प्रयत्न केले गेले. त्यानंतर आता माथेरान नळपाणी योजनेसाठी उल्हास नदी वरून २३ डिसेंबर २०२४ रोजी पाणी उचलून माथेरान येथील जलशुद्धीकरण प्रकल्प येथे पोहचले आहे.त्यामुळे माथेरान मधील पर्यटन हंगाम चांगला जाण्याची शक्यता आहे.

# 'जिल्ह्यात सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम यशस्वीपणे राबवावी'

## ■ जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे यांचे निर्देश



**। रायगड । प्रतिनिधी ।**

केंद्राने भारत देश क्षयरोग मुक्त करण्याचे ध्येय ठेवलेले आहे जे की शाश्वत विकास ध्येयाच्या अपेक्षित कालावधी पेक्षा ५ वर्ष अगोदर आहे. याकरिता राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत विविध मोहिमा राबविल्या जात असून २३ डिसेंबर ते ०३ जानेवारी या कालावधीत जिल्ह्यात राबविण्यात येणारी सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम यशस्वीपणे राबवावी असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

जिल्हा टीबी फोरम व जिल्हा कोमारबिटी समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राजस्व सभागृहात संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, रायगड जिल्ह्यातील सर्व तालुके व पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये यापूर्वी निश्चित केलेल्या अतिजोखीम ग्रस्त लोकसंख्येत ही मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत अतिजोखीम ग्रस्त लोकसंख्येचे पथकाद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. तसेच सर्व क्षयरोग संशयितांची थुंकी नमुना तपासणी व क्ष-किरण तपासणी करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यामध्ये ५७ सुक्ष्मदर्शी तपासणी केंद्रे व प्रत्येक तालुक्यामध्ये नॅट व क्ष-किरण तपासणी सुविधा उपलब्ध आहे.

तसेच पिडीलाईट इंडस्ट्रीज यांच्या सीएसआर निधीतून उपलब्ध झालेली मोबाईल एक्स-रे व्हॅन व महानगर गॅसच्या सीएसआर निधीतून उपलब्ध झालेले हँडहेल्ड एक्स-रे मशिन या करिता उपलब्ध करुन दिलेले आहे.

दोन आठवडयापेक्षा जास्त कालावधीचा खोकला तसेच दोन आठवडयापेक्षामुदतीचाताप, मागील तीन महिन्यामध्ये वजनात लक्षणीय घट, मागील सहा महिन्याच्या कालावधीत कधीही थुंकीवाटे रक्त पडत असल्यास, मागील एक महिन्यापासून छातीत दुखणे, यापूर्वी क्षयरोगाचे उपचार घेतलेले असल्यास अशी लक्षणे असलेल्या व्यक्तींनी व अतिजोखमीच्या भागात वास्तव्य करणाऱ्या व्यक्तींनी स्वतःची थुंकी तपासणी व क्ष-किरण तपासणी करावी असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी रायगड डॉ. सचिन जाधव यांनी केले आहे.

# ढगाळ वातावरणाचा फटका बागायतदारांना



**। उरण । वार्ताहर ।**

सातत्याने होत असलेल्या ढगाळ, वातावरणातील बदलांचा फटका यावर्षी आंबा बागायतदारांना बसणार आहे. तसेच वाल,चवळी, हरभरा, मूग या रब्बी हंगामातील पिकांच्या उत्पादनातही घट होण्याची भिंती शेतकरी व्यक्त करत आहेत.तरी यावर उपाययोजना करण्यासाठी कृषि अधिकारी वर्गाने उरण तालुक्यातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे असल्याचे मत शेती निष्ठा शेतकरी प्रकाश ठाकूर यांनी व्यक्त केली आहे.

उरण तालुक्याच औद्योगिकीकरण झपाट्याने होत असले तरी बहुतांश शेतकरी हे आपल्या शेतातील भात शेतीला जोडधंदा म्हणून वाल, चवळी, हरभरा, मूग या पिकाची लागवड ही रब्बी हंगामातील पीक म्हणून घेतात. त्यामुळे आर्थिक उत्पन्न हे रब्बी हंगामातील पिकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळत आहे.

यावर्षी सातत्याने होत असलेल्या ढगाळ, वातावरणातील बदलांचा फटका हा आंबा बागायतदारांना बसणार आहे. त्याच रब्बी हंगामातील पीक वाल, चवळी, हरभरा, मूग यांना ही बसणार आहे.तरी उरण तालुका कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांवर ओढणाऱ्या अस्मानी संकटातून सुटका करण्यासाठी शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शकपर कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयात करावे अशी मागणी शेतकरी,आंबा बागायतदार व्यक्त करत आहेत.

# सौर ऊर्जानिर्मितीसाठी महावितरणतर्फे मोफत नेट मीटर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

छतावर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसवून मोफत वीज मिळविण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत आता महावितरणतर्फे ग्राहकांना मोफत नेट मीटर मिळेल. त्यामुळे ग्राहकांना आपल्या प्रकल्पात किती वीजनिर्मिती झाली व घरामध्ये किती विजेचा वापर झाला याची अद्ययावत माहिती मोबाईल ॲपवर मिळेल. शासनाच्या सूचनेवरून ग्राहकांना ही सवलत देण्यात येत आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

केंद्राने महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. त्या अंतर्गत तीन किलोवॅटपर्यंतच्या क्षमतेचे प्रकल्प बसविणाऱ्या ग्राहकांना केंद्र सरकारकडून अनुदान मिळते.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत ग्राहकाच्या छतावर बसविलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पात किती वीज तयार झाली, ग्राहकाने घरात किती वीज वापरली व किती अतिरिक्त वीज ग्राहकाकडून महावितरणला विकली गेली याची नोंद करण्यासाठी एक वेगळा नेट मीटर बसवावा लागतो. आतापर्यंत त्याचा खर्च ग्राहकाला करावा लागत होता. आता महावितरणने ग्राहकांना सोलर नेट मीटर विनामूल्य पुरविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ग्राहकांचे पैसे वाचण्यासोबत त्यांना मोबाईल फोनवरच वीजनिर्मिती, वीज वापर, अतिरिक्त युनिट इत्यादी माहिती दररोज मिळेल. त्यानुसार त्यांना वीजवापराचे नियोजन करून वीजबिल शून्य येण्यासाठी नियोजन करता येईल. सध्या ३ लाख २३ हजार ग्राहकांनी महावितरणकडे प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केले आहेत. या ग्राहकांना महावितरणच्या सोलर नेट मीटर विनामूल्य देण्याच्या निर्णयाचा लाभ होईल.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना या वर्षी फेब्रुवारी महिन्यात सुरू झाल्यापासून राज्यात ८३,०७४ ग्राहकांनी छतावरील सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसवून योजनेचा लाभ घेतला आहे. त्यांची एकत्रित क्षमता ३१५ मेगावॅट आहे व त्यांना केंद्र सरकारकडून ६४७ कोटी रुपये अनुदान मंजूर झाले आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांनी वेबसाईटवर नोंदणी करावी लागते. महावितरण ही या योजनेची अंमलबजावणी करणारी राज्यातील नोडल एजन्सी आहे. महावितरणने यासाठी एक स्वतंत्र पोर्टल तयार केले आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना व पुरवठादारांना महावितरणच्या कार्यालयात येण्याची आवश्यकता राहत नाही. नोंदणी केल्यापासून अंतिम मंजुरीनंतर प्रकल्प सुरू करेपर्यंत फेसलेस व पेपरलेस पद्धतीने काम चालू राहते. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत गतिमानता आली आहे.

पान १ वरून

## शस्त्रांचा धाक दाखवून लूटले

प्रजापती भुलेश्वर परिसरात राहत असून तो एका खासगी कुरियर कंपनीत कामाला आहे. हरिश प्रजापती हे त्याचे मालक असून त्यांनी शुक्रवारी त्याला दहा लाख रुपये दिले होते. ही रोख घेऊन तो गिरगावमधील श्रीनाथ सोसायटीमध्ये आला होता. यावेळी त्याच्या मागून दोन तरुण तेथे आले. या दोघांनी शस्त्रांचा धाक दाखवून इंद्रकुमार आणि त्याचा सहकारी अनुरागसिंग उमेशसिंग राजपूत यांना ठार मारण्याची धमकी दिली. तसेच इंद्रकुमार आणि अनुरागसिंग जवळील रोख दहा लाख रुपये त्यांनी घेऊन पलायन केले. यावेळी दोघांनी इंद्रकुमार आणि अनुरागसिंगच्या डोळ्यात मिरचीची पूड टाकली. या प्रकारामुळे दोघेही प्रचंड घाबरले. त्यांनी घडलेल्या घटनेची माहिती मालकांना दिली. मालकाच्या सूचनेनंतर त्यांनी घडलेला प्रकार व्ही. पी. रोड पोलिसांना सांगितला. याप्रकरणी इंदरकुमार प्रजापती याच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन्ही आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी घटनास्थळाच्या आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यामधील चित्रीकरण ताब्यात घेतले असून या चित्रीकरणाची पाहणी करून पळून गेलेल्या आरोपींचा पोलीस शोध घेण्यात येत आहे. आरोपी बराच काळ तक्रारदार व त्याचा सहकाऱ्याचा पाठलाग करीत होते. तसेच या गुन्ह्यांमागे ओळखीच्या व्यक्तीचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## २२ हजार शेतकऱ्यांना ९ कोटींची प्रतीक्षा

स्वाक्षरीने जिल्हा प्रशासनाला पाठविण्यात आला. त्यानंतर जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या स्वाक्षरीने तो अहवाल विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे. परंतु अद्यापही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे समोर आले आहे. शासनाकडे हा प्रस्ताव प्रलंबित आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना भरपाईची प्रतीक्षा लागून राहिली आहे. जुलै महिन्यात झालेल्या नुकसानीची भरपाईदेखील अद्याप मिळाली नसल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

## बडोदा-मुंबई प्रवास होणार सुसाट

पुढील ९ महिन्यात या रस्त्याचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने कंबर कसली आहे. सुमारे सव्वा चार किलोमीटर अंतरावर दुहेरी बोगद्याचे काम ६० टक्के पूर्ण झाले आहे. तसेच महामार्गाच्या शेवटच्या पॅकेज क्रमांक १७ चे सरासरी ४५ टक्के काम पूर्ण झाले आहे. यासाठी १४०० कोटी रुपये खर्च केला जात आहे. पावसाळा संपल्यावर पुन्हा एकदा कामाने गती पकडली आहे. दुहेरी बोगदा आरपार करण्याचे काम ठरविलेल्या मुदतीपेक्षा अगोदर पुर्ण झाल्याने प्राधिकरणाच्या कामाविषयी समाधान व्यक्त केले जात आहे.

पॅकेज १७ हा ९.६ किलोमीटर अंतराचा असून बदलापूरच्या भोज गावापासून ते पनवेलमधील मोरबे गावापर्यंत हा रस्ता बांधला जाणार आहे. यामध्ये ४.३९ किलोमीटरचे दुहेरी बोगदे माथेरान डोंगररांगांखालून खोदले आहेत. १३ मीटर उंच आणि २३ मीटर रुंदीच्या या दुहेरी बोगद्यात ८ वेगवेगळ्या मार्गिका असतील. मोरबे ते कोन गावापर्यंत हे काम एमएसआरडीसी करण्याचे नियोजित होते. त्यासाठी निविदा प्रक्रिया पार पडली. एमएसआरडीसीने मोरबे गावातील अनेक शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम दिली. मात्र मोरबे गावानंतर अनेक गावांचे भूसंपादन रखडल्याने या बहुउद्देशीय मार्गिकेच्या कामाचा श्रीगणेशा होऊ शकला नाही. कर्ज मिळाल्यानंतर तसेच निधी उपलब्ध झाल्यानंतरच एमएसआरडीसी या मार्गाचे काम हाती घेऊ शकेल. सध्या तरी येथे युद्ध पातळीवर काम सुरू असल्याने हा महामार्ग वेळेत पूर्ण होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

## पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करण्याचं धोरण रद्द

संधी मिळेल. मात्र जर त्या परीक्षेत पुन्हा नापास झाल्यास अशा विद्यार्थ्यांना पुढच्या इयत्तेत प्रवेश मिळणार नाही. मात्र इयत्ता आठवीपर्यंत कुठल्याही विद्यार्थ्याला आठवीपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही, असेही सरकारने स्पष्ट केले आहे. शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार यांनी सांगितले की, मुलांमधील शिकण्याच्या क्षमतेमध्ये होत असलेली घसरण थांबवण्यासाठी हे पाऊल आवश्यक दिसत आहे. मंत्रालयाने विशेष करून पाचवी आणि आठवीवर लक्ष केंद्रित केलं आहे. त्याचं कारण पायाभूत शिक्षणाच्या दृष्टीने हे वर्ग महत्त्वाचे मानले जातात. या नव्या धोरणामधून विद्यार्थी आणि शिक्षकांना अभ्यासाप्रति अधिक जबाबदार बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## विनोद कांबळीची प्रकृती खालावली

रुग्णालयात दाखल करण्यात आले. सिटी स्कॅन करण्यात आले असून त्याचे रिपोर्ट्स हे संध्याकाळपर्यंत येतील. सध्याच्या घडीला त्याला आयसीयूमध्ये ठेवण्यात आले आहे. अशी माहिती प्रगती हॉस्पिटलचे डॉक्टर शैलेश सिंह यांनी दिली आहे. ते आपल्या पत्नीशी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून बोलतात, असेही डॉक्टरांनी सांगितले आहे. कांबळीचा तो व्हिडिओ पाहून अनेकांना बसला धक्काकाही दिवसांपूर्वीच क्रिकेटची पंढरी असलेल्या मुंबईच्या शिवाजी पार्क परिसरात क्रिकेटचे गुरु द्रोणाचार्य रमाकांत आचरेकर यांच्या स्मारकाचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमात सचिन तेंडुलकरसह विनोद कांबळीही सहभागी झाल्याचे पाहायला मिळाले होते. याच कार्यक्रमात विनोद कांबळीची प्रकृती त्याला साथ देत नाही, ते समोर आले होते. अडखळत बोलणं अन् अधाराशिवाय उभे राहणेही कांबळीला जमत नाही, हे पाहून अनेकांना धक्का बसला होता. त्यानंतर विनोद कांबळीनं एक मुलाखतही दिली. ज्यात त्याने वेगवेगळ्या समस्येचा सामना करत असल्याचे सांगितले होते. या परिस्थितीतही सचिन सोबत आहे, त्याने रुग्णालयातील खर्च उचलला, अशी माहितीही त्याने दिली होती.

## चार बांगलादेशीय नागरीक ताब्यात

दीपक सुर्वे यांनी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध आणि स्थानिक पोलीसांचे संयुक्त पथक स्थापन करुन संजय ठाकूर यांच्या घराजवळ शनिवारी सापळा रचला. पोलीसांच्या पथकाने यावेळी भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या ३७ वर्षीय अमिषा कमाल काजी, १८ वर्षीय शर्मिन कमाल काजी, ४० वर्षीय राणी किमारुल शेख, २७ वर्षीय सैफ्फुला अहमद अली खान यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या महिला व तरुणींकडे चौकशी केल्यावर घरकाम करत असल्याचे समजले.

# आरोग्य तपासणी शिबिराला प्रतिसाद

**। रसायनी । वार्ताहर ।**

मोहोपाडा येथील नव्याने सुरू झालेल्या अष्टविनायक हॉस्पिटलमध्ये मोफत मेगा आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात रँडम ब्लड शुगर, सीबीसी, रक्तदाब, ईसीजी, एक्स रे, ऑडिओमेट्री श्रवण क्षमता तपासणी, बीएमआय, डोळ्यांची तपासणी आणि स्पेशालिस्ट डॉक्टरांकडून तपासणी करून रुग्णांना तज्ञ डॉक्टरांकडून मोफत मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिरात एकूण २०९ नागरिकांनी आपल्या तपासण्या करून शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. या शिबिरासाठी अष्टविनायकच्या टीमचे डॉ.हरुण शेख यांच्यासह डॉक्टरांनी विशेष मेहनत घेऊन शेवटच्या रुग्णापर्यंत तपासण्या केल्या. अशाच प्रकारचे आणि वेगवेगळ्या स्पेशालिटीचे शिबीरे घेण्याचा मानस असल्याचे हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ. अगरवाल यांनी सांगितले. रुपेश यादव यांनी या शिबीरात सहभागी झालेल्या नागरिकांचे आभार व्यक्त केले.



# परांजपे विद्यामंदिरच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड येथील वि. ह. परांजपे विद्यामंदिरच्या सन २००६-०७च्या एसएससी बॅचच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन नुकतेच संपन्न झाले. यावेळी १७ वर्षांनी सर्व विद्यार्थी एकत्र आले होते. प्रारंभी सर्वांचे स्वागत करण्यात आले. शाळेमध्ये एका वर्गात सर्व माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला ह्या नंतर शाळेच्या परिसरात फरफटका देखील मारला.गोंडाळे येथील भालेकर फार्म येथे दुसरे सत्र झाले. या सत्रात सर्वच उपस्थितांना आठवण पर भेटवस्तू देऊन, त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर सर्वांनी आपापला परिचय करुन दिला. इतक्या वर्षानंतर एकत्र आल्याने एकमेकांप्रती असलेले प्रेम, जिव्हाळा दिसून येत होता. चेष्टामस्करी करित, जून्या आठवणींना यावेळी उजाळा देण्यात आला. रात्रीचे भोजन झाल्यावर पुन्हा भेटण्याचे ठरवून एक नवीन उर्जा घेऊन, सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला. अजिंक्य शेठ यांनी सूत्रसंचालन व बालपणीचे खेळ घेत कार्यक्रमाची रंगात वाढवली. हा स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी अनिकेत शिंदे,नितेश महाबळेश्वरकर, साहिल हेलेकर, सिद्धेश वडके, रुपेश पवार यांनी मेहनत घेतली.

# गाडीच्या वादावरुन मारहाण

- **अनिल भोसले यांच्यावर जीवघेणा हल्ला**
- **नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेवरील भिवपुरी रोड रेल्वे स्थानकाच्या पुढे चिंचवली गावात असलेल्या रेल्वे फाटकात काही गाड्या अडकून पडल्या होत्या. त्यावेळी गाडी काढण्याच्या वादातून संवाद येथील अनिल अनंता भोसले यांना अन्य गाडीमधील चार जणांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे. या मारहाणीत रक्तबंबाळ झालेल्या अनिल भोसले यांची नेरळ पोलिसांनी रुग्णालयात जाऊन तक्रार दाखल करून घेतली असून एका तरुणाला अटक केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अनिल भोसले हे किरवली येथून सलवाड येथे जाण्यासाठी मध्य रेल्वेवरील चिंचवली फाटक येथून जात होते. सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास फाटकात झालेल्या वाहतूक कोंडीमध्ये अनिल भोसले आणि अन्य कार चालकांच्यात गाडी पुढे-मागे करण्यावरून किरकोळ बाचाबाची झाली. त्यावेळी एका पांढऱ्या रंगाच्या कारमधील चालकाने त्याची कार आडवी घालुन डाव्या बाजुने पुढे जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या कारला पुढे जाता येत नसल्याने त्या कारमधील दोन तरुणांनी प्रथम अनिल भोसले यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. शिवीगाळी करुन त्यांना गाडी पाठीमागे घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे अनिल भोसले यांनी आपली कार मागे घेतो, शिवीगाळी करु नका असे बोलले.

याच गोष्टीचा राग मनात धरुन त्यांनी पुन्हा शिवीगाळ करायला सुरवात केली. तसेच, गाडीतील इतर दोन व्यक्तींनी अगोदरच गाडीतुन उतरून अनिल भोसले यांच्या गाडीचे दरवाजा आणि काचेवर हाताने जोर जोरात मारण्यास सुरुवात केली होती. त्यानंतर अनिल भोसले यांनी आपल्या गाडीच्या काचा खाली घेतल्या आणि त्यावेळी काहीही न बोलता आरोपी तरुणांनी अनिल भोसले यांना हाताचे ठोसे दिले. त्याचवेळी पांढऱ्या गाडी चालकाने चॉपरच्या चपट्या बाजुने अनिल भोसले यांना मारहाण करत त्यांच्या चेहेऱ्यावर, नाकावर आणि डोळ्याजवळ गंभीर दुखापत केली. त्यानंतर भोसले यांना स्थानिकांच्या मदतीने कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे प्राथमिक उपचार घेतल्यानंतर ते पनवेल येथील खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत.

दरम्यान, कर्जत उपजिल्हा रुग्णलयात अनिल भोसले हे उपचार घेत असताना नेरळचे पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांचा जाबजबाब घेऊन गुन्हा दाखल केला आहे. तसेच, रात्री अकरा वाजता अनिल भोसले यांना मारहाण करणाऱ्या एका तरुणाला ताब्यात घेतले असून अन्य तिघांचा शोध सुरु आहे.

# कळंबुसरे-कोप्रोली साकवचे काम सुरू

**। उरण । वार्ताहर ।**



उरण तालुक्यातील पुर्व विभागातील गावांना जोडणाऱ्या कळंबुसरे ते कोप्रोली रस्त्यावरील जिर्ण झालेल्या साकवाचे काम उरणच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतले आहे. त्यामुळे प्रवाशी नागरीकांनी समाधान व्यक्त केले आहे.

उरण तालुक्याचा विकास हा जेएनपीए बंदराच्या माध्यमातून झपाट्याने होत आहे. त्यामुळे उरण पुर्व विभागातील गाव परिसरात ही मालाची आयात निर्यात करणाऱ्या गोदामांचीसंख्यावाढतचाललीआहे. पुर्व विभागातील गावांना जोडण्याचे काम कळंबुसरे ते कोप्रोली हा रस्ता करत आहे. या रस्त्यावरुन सातत्याने मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वर्दळ असल्याने कळंबुसरे-मोठी जुई खाडीवरील साकव हा जिर्ण झाल्याने रात्री अपरात्री अपघात होण्याचा धोका निर्माण झाला होता.त्यामुळे या साकवाचे नव्याने काम सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घ्यावे, अशी मागणी सातत्याने प्रवासी नागरीकांकडून करण्यात येत होती. अखेर, उरणच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता नरेश पवार यांनी या मागणीची दखल घेऊन कळंबुसरे-मोठी जुई खाडीवरील साकवाचे काम नव्याने हाती घतले आहे.

# पनवेल झोपडपट्टी मुक्तीकडे वाटचाल

**। पनवेल । वार्ताहर ।**

प्रधानमंत्रीआवासयोजनेअंतर्गत पनवेल महानगरपालिकेच्यावतीने २ हजार ६०० घरे बांधण्यात येणार आहेत. यामध्येपहिल्याटप्प्यातपटेल मोहल्ला,कच्छीमोहल्लायाठिकाणी इमारती बांधण्यात येणार आहेत. यासाठी महापालिकेच्यावतीने झोपड्या रिकाम्या करण्यासाठी झोपडीधारकांना या आधी नोटीसा देण्यात आल्या होत्या. मात्र, पटेल मोहल्ला, कच्छी मोहल्ला येथील जनहित कल्याणकारी सोसायटीच्यावतीने महापालिकेच्या विरोधात मुंबई येथील मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केली होती. उच्च न्यायालयाने झोपडपट्टीधारकाने ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत झोपडी रिक्त करावी, असे आदेश दिले होते. खऱ्या अर्थाने या योजनेमुळे पनवेल आता झोपडपट्टी मुक्त होणार असून लवकरच प्रतुक्ष कामाला सुरवात होणार असून पहिल्या टप्प्यात पटेल मोहल्ला आणि कच्ची मोहलतील ९०० झोपडपट्टीधारकांना स्वतःची घरे मिळणार आहेत.

# नेरळमधील बंद यशस्वी



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

परभणी येथे झालेले भारतीय संविधान प्रकरण, सामनाथ सुर्यवंशी हत्या प्रकरण, बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल देशाचे गृह मंत्री अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्याचा निषेध म्हणून नेरळ बंदचे आवाहन करण्यात आले होते. सोमवारी (दि.२३) सकाळपासून दुपारपर्यंत जाहीर करण्यात आलेला बंद यशस्वी झाला असून व्यापाऱ्यांनी नेरळ बाजारपेठ पूर्णपणे बंद ठेवण्यात आली होती. नेरळमध्ये राज्यातील विविध घटनांवर बंद पाळण्यात यावा, अशी मागणी येथील तरुणांनी रविवारी (दि.२२) बाजारपेठेतील व्यापारी व रिक्षा संघटनांची भेट घेऊन केली होती.

# ग्रामस्थांनी दिला एकजूटीचा हात

## स्वदेस फाऊंडेशनची लाभली साथ

**। म्हसळा । वार्ताहर ।**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त रायगडमधील ७५ गावे ही स्वप्नातील गावे म्हणून घोषित करण्यात येत आहेत. या ७५ गावांपैकी म्हसळा तालुक्यातील घुम-रुद्रवट ग्रामपंचायत हद्दीतील रुद्रवट हे गाव स्वप्नातील गाव म्हणून घोषित करण्यात आले आहे.



आपले गाव 'स्वप्नातील गाव' बनविण्याच्या उद्देशाने गाव विकास समिती, ग्रामस्थ, महिला मंडळ, मुंबईकर मंडळ व तरुण मंडळी यांनी स्वदेस फाउंडेशनच्या अधिकारी वर्गाच्या मार्गदर्शनाखाली मागील दोन अडीच वर्षांपासून प्रयत्न सुरू केले होते. सुरुवातीला आपल्या गावच्या गरजा काढण्यात आल्या. यानंतर पाच 'स' म्हणजेच स्वच्छ, सुंदर, स्वस्थ, समृद्ध व सक्षम या मुख्य घटकांचा विचार करून गाव विकास आराखडा तयार केला गेला. ही सर्व विकास कामे स्वदेस, शासन व ग्रामस्थ यांच्या मार्फत करण्यास सुरुवात करण्यात आली. शेवटी त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून रुद्रवट हे गाव स्वप्नातील गाव म्हणून घोषित झाले.


यावेळी ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्रीकांत बिरवाडकर यांनी प्रस्ताविकपर मनोगत व्यक्त करताना गावातील नागरिकांसाठी सुरू असलेले दराडोई उत्पन्न वाढीचे उपक्रम, फळबाग लागवड, प्लास्टिक मुक्त गाव, ओला व सुका कचरा व्यवस्थापन, महिलांची आर्थिक साक्षरता, पाणी व्यवस्थापन, हागणदारी मुक्त गाव, घरे रंगविण्यासाठी महिला व युवकांचे योगदान, क्रिकेट संघाचे गावातील विविध विकास कामांमध्ये असलेले योगदान, एकोप्याने साजरे होत असलेले सण व उत्सव, आरोग्यासाठी सुरू असलेले उपक्रम अशा सर्वच उपक्रमांसाठी स्वदेस फाऊंडेशन व शासन, गाव विकास समिती व ग्राम स्थांचे लाभलेले सहकार्य या विषयी माहिती दिली.

या आयोजित कार्यक्रमासाठी स्वदेस फाऊंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार, वरिष्ठ व्यवस्थापक शिवतेज ढऊळ, सरपंच साक्षी घोले, तालुका कृषी अधिकारी दत्तात्रय शिंदे, पं.स.कृषी विस्तार अधिकारी अशोक बाक्कर, संख्याकी अधिकारी अजय खराडे, पशुसंवर्धन अधिकारी पूजा चव्हाण, समन्वयक कौस्तुभ कांबळे, श्रीकांत बिरवाडकर, केतन आग्रे, अनंता आग्रे, चांदणी शिंदे, शांताराम काप, संतोष बोर्ले, अंबाजी काप, राजेश रटाटे, प्राची शिगवण, वर्षा रटाटे, योगेश पाटील, रामचंद्र बिरवाडकर, सतिश घोले आदींसह राजीप शाळा घूम व रुद्रवट शाळेचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# हत्या करून चोरी करणारा अटकेत

**। पनवेल । वार्ताहर ।**

एका महिलेची हत्या करून जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला अडीच महिन्यानंतर गुन्हे शाखा पनवेलच्या पथकाने अथक मेहनत घेऊन त्याला ताब्यात घेतले आहे. ही घटना पनवेल तालुक्यातील वलप गावामध्ये घडली होती. वलप गावातील महिला संगिता राजेंद्र आगवणे (४९) या पायी चालत जात असतातना एका अज्ञात इसमाने जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने त्यांचा गळा आवळुन हत्या करून त्यांच्या अंगावरील सोन्याचे मंगळसुत्र, कानातील झुमके व सोनसाखळ्या, पोको कंपनीचा मोबाईल व पर्स असे एकुण १ लाख ९५ हजार ८५० रूपये किंमतीचे ऐवज चोरी करून पसार झाला होता.



# ही फूट वेळीच रोखा

एकीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घ्यायचे आणि दुसरीकडे त्यांचे नाव हृदयात कोरलेल्या दलित समुदायांना दडपण्याचा प्रयत्न करायचा हेच इथल्या राज्य व केंद्र सरकारांचे धोरण आहे. आंबेडकरांचे नाव घेणे ही केंद्राचे गृहमंत्री अमित शाह यांना तर फॅशन वाटते. त्यापेक्षा देवाचे नाव घ्या, तुम्हाला मुक्ती मिळेल असे ते बिनदिक्कतपणे संसदेत सांगतात. मात्र बाबासाहेबांचे नाव घेऊन या जगातील नरकमय आयुष्यातून मुक्ती मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना त्यांचा पक्ष व सरकार कस्पटासमान मानतो व चिरडण्याचा प्रयत्न करतो हे वेळोवेळी दिसलेले आहे. अमित शाह जेव्हा संसदेत बोलत होते त्याच दिवशी उत्तर प्रदेश आणि गुजरातेत दलितांवरच्या अत्याचारांच्या घटना समोर आल्या. गुजरातेत तर लग्न समारंभात दलित जातीतील नवरामुलगा घोड्यावर बसला म्हणून त्याला बेदम मारहाण केल्याची घटना घडली. गुजरात व उत्तर प्रदेश या भाजपच्या प्रयोगशाळा आहेत. तेथे भाजपला विधानसभेत विक्रमी बहुमत आहे. अनेक वर्षांपासून सत्ता आहे. तरीही तेथे हे प्रकार घडतात याचे कारण त्या पक्षातील नेत्यांचे या गुन्हेगारांना पूर्ण पाठबळ असते. दलित निवडणुकीत आपल्याला मते देत नाहीत तर त्यांच्या हिताची काळजी आपण घेण्याची गरज नाही अशी जणू भाजपची भूमिका आहे. त्यानुसार तो पक्ष वागतो. महाराष्ट्रात इतकी वर्षे दलित व पुरोगामी चळवळीचा दबाव राज्यकर्त्यांवर असे. सत्तारुढ काँग्रेस पक्षही या चळवळींबद्दल सहानुभूती बाळगून होता. मात्र यंदा विधानसभेत राक्षसी बहुमत मिळालेले असल्याने सत्तारुढ महायुतीला दलित, मुस्लिम इत्यादी समुदायांना सोबत घेण्याची गरज वाटत नसावी. परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी याचा पोलिस कोठडीतील संशयास्पद मृत्यू आणि सरकारतर्फे करण्यात आलेली वरवरची कारवाई यामुळे सरकारची दलित समुदायांबाबतची बेपर्वा वृत्ती समोर आली आहे.

## कोठडीतील बळी

परभणीत दहा डिसेंबरला आंबेडकरांच्या पुतळ्याची कथितरीत्या विटंबना झाली. आरोपीला ताब्यात घेण्यात आले. तो मानसिकदृष्ट्या अपंग असल्याचे सांगण्यात आले. विटंबनेच्या घटनेमुळे जनतेत प्रचंड संताप निर्माण झाला व अकरा डिसेंबरला परभणी बंद पुकारण्यात आला. मोर्चाही काढला गेला. त्यावेळी जमावातील काही जणांनी अनुचित तोडफोड केली. मात्र त्याच वेळी पोलिसांनी शहरामध्ये दलित वस्त्यांमध्ये झडतीसत्र राबवले. त्यांनीही त्या जमावातील बेछूट लोकांची मनोवृत्ती दाखवली. कायद्याचे रक्षण करणे हे पोलिसांचे काम आहे. मात्र वर्दीचा आधार घेऊन त्यांनी आपल्या जातीय मनोवृत्तीचे दर्शन घडवले. दलित वस्त्यांमधील झडत्यांमध्ये घरे तोडण्यात आली व लोकांनाही मारहाण झाली, असा आरोप आहे. आता सरकार त्याचा इन्कार करीत असले तरी याबाबत सत्य बाहेर येणे आवश्यक आहे. पोलिसांनी या काळात ज्या ५० लोकांना ताब्यात घेतले त्यात सोमनाथ सूर्यवंशीचाही समावेश होता. वास्तविक सोमनाथ तोडफोड करणाऱ्या वा कायदा मोडणाऱ्या जमावामध्ये नव्हता. त्याला कॉलनीतून उचलून नेले गेले असा कुटुंबियांचा आरोप आहे. आधी तो पोलिस कोठडीत होता. १५ डिसेंबरला त्याचा न्यायालयीन कोठडीत असताना मृत्यू झाला. आधी हृदयविकाराच्या झटक्याने त्याचा प्राण गेला असे सांगितले गेले. पण नंतर पोस्टमार्टेममध्ये तीव्र जखमांमुळे त्याला हृदयविकाराचा झटका आला असे अहवालात आहे असे म्हणतात. या जखमांची व मृत्यूची चौकशी होईलच. पण सध्या तरी हा पोलिस कोठडीतील बळी असल्याचे दिसते. पोलिसांनी व प्रशासनाने आंबेडकरी जनतेचा संताप अधिक संयमाने हाताळण्याची गरज होती. पण तिथे त्यांनी दांडगाई केली असे या घटनेवरून दिसते. नंतर सोमनाथच्या मृत्यूच्या निषेधार्थ जे आंदोलन झाले त्या दरम्यान विजय वाकोडे नावाच्या स्थानिक नेत्याचा हृदयविकाराने मृत्यू झाला. आता सरकारने सोमनाथ व विजय या दोघांच्याही कुटुंबियांना मदतीची घोषणा केली असली तरी ते पुरेसे नाही. या सर्व प्रकरणात पोलिसांनी जी दलितविरोधी मानसिकता दाखवली व कार्यकर्त्यांना दडपून टाकण्याची भूमिका घेतली त्याची चौकशी होण्याची गरज आहे. पोलिसांनी कोणाच्या आदेशावरून हे कृत्य केले हे उघड व्हायला हवे.

## संतोष देशमुख हत्या

दरम्यान, मराठवाड्यातच आणखी एका प्रकरणावरून सध्या राजकीय वादळ उठले आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे हत्या झाल्याने सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. या हत्येमागे वाल्मिक कराड याचा हात असल्याचे बोलले जात असून हा कराड धनंजय मुंडे यांचा उजवा हात असल्याचे मानले जाते. मराठा आरक्षणावरून आधीच संवेदनशील बनलेल्या या परिसरातील या हत्येमुळे मराठा विरुध्द वंजारी हा संघर्ष आणखी तीव्र होणार आहे. ती चिंतेची बाब आहे. देशमुख यांचे अपहरण करून नंतर हत्या करण्यात आली. त्यांच्याकडे दोन कोटींची खंडणी मागण्यात आली असा आरोप आहे. नऊ डिसेंबरला हत्या झाल्यानंतर अकरा तारखेला वाल्मिक कराडसह तीन जणांविरुध्द गुन्हा दाखल झाला. त्यातील विष्णू चाटेला अटक झाली. कराड मात्र अजूनही पोलिसांना सापडत नाही. हा सर्वच प्रकार संशयास्पद आहे. परवा शरद पवारांनी या गावी भेट देऊन देशमुख यांच्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. हा प्रकार अडचणीचा ठरतो आहे हे पाहताच अजितदादाही तेथे गेले. आरोपी कोणीही असला तरी त्याला कठोर शिक्षा करण्याचे देवेंद्र फडणवीसांनी विधिमंडळात सांगितले. पण पोलिसी तपास फार संथ गतीने चालू आहे. परभणीत काय किंवा येथे काय, पोलिस राजकीय इशाऱ्यावरून कारवाई करतात असा संशय बळकट होऊ लागला आहे. वाल्मिकी कराडच्या गुंडगिरीच्या सुरस कथा बाहेर येऊ लागल्या आहेत. शिवाय तो आणि मुंडे कुटुंबिय यांचे आर्थिक हितसंबंध असल्याचे पुरावे सोशल मिडियातून मांडले जात आहेत. मराठवाड्याला जातीय तणावांचा मोठा इतिहास आहे. विद्यापीठ नामांतराच्या चळवळींपासून ते अलिकडच्या मराठा आरक्षण प्रश्नांची रणभूमी मराठवाडा राहिला आहे. अलिकडच्या निवडणुकांमध्ये जातींच्या आधारे मतविभागणी झाली झाल्याचे दिसले होते. हा तणाव आणि समाजातील फूट वाढणे कोणाच्याच हिताचे नाही.

विचार

# जॉर्ज सोरोसशी संबंधांवरून काँग्रेसची गोची

***उद्योजक गौतम अदानी यांनी अमेरिकेतील काम मिळवण्यासाठी लाच दिल्याच्या कथित आरोपावरून काँग्रेसने गेल्या १५ दिवसांपासून संसदेच्या कामकाजात अडथळे आणले आहेत. या शहाला काटशह म्हणून भारतीय जनता पक्षाने जॉर्ज सोरोस आणि सोनिया गांधी यांच्या कथित संबंधाचा मुद्दा उपस्थित केला आहे. जॉर्ज सोरोस जगभर वादग्रस्त आहेत. कोण आहेत जॉर्ज सोरोस, त्यांचा सोनिया गांधी यांच्यांशी काय संबंध?***

**भागा वरखडे**

जॉर्ज सोरोस आणि काँग्रेस पक्षाच्या नेत्यांमधील कथित संबंधांच्या मुद्द्यावरून संसदेचे कामकाज अलिकडे पुन्हा एकदा विस्कळीत झाले. या मुद्द्यावर भाजप सातत्याने आक्रमक भूमिका घेत आहे. या मुद्द्यावर चर्चेची मागणी करत त्यांनी संसदेत गोंधळ घातला. एका पत्रकार परिषदेत भाजपने आरोप केला होता की काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी या जॉर्ज सोरोस फाऊंडेशन निधी पुरवत असलेल्या संस्थेशी संबंधित आहेत. त्या फाऊंडेशनने काश्मीरच्या स्वतंत्र राष्ट्राच्या कल्पनेला पाठिंबा दिला होता. भाजपने म्हटले होते, की हे संबंध भारताच्या अंतर्गत बाबींवर विदेशी संस्थांचा प्रभाव दर्शवतात. भाजपचे म्हणणे आहे की 'ऑर्गनाइज्ड क्राइम अँड करप्शन रिपोर्टिंग प्रोजेक्ट' आणि हंगेरियन-अमेरिकन व्यापारी जॉर्ज सोरोस यांनी भारताची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करण्यासाठी आणि मोदी सरकारला बदनाम करण्यासाठी विरोधकांशी संगनमत केले आहे. फोरम ऑफ डेमोक्रॅटिक लीडर्स इन एशिया पॅसिफिक (एफडीएल-एपी) फाऊंडेशनच्या सहअध्यक्ष म्हणून सोनिया गांधी जॉर्ज सोरोस फाऊंडेशनद्वारे अर्थसहाय्यित संस्थेशी संबंधित असल्याचा दावा भाजपने केला आहे. पक्षाच्या मते 'एफडीएल-एपी फाऊंडेशन'ने काश्मीर हा वेगळा प्रदेश मानला जावा असे मत व्यक्त केले आहे. सोनिया गांधी आणि काश्मीरला स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता देण्याच्या कल्पनेला पाठिंबा देणारी संघटना यांच्यातील हे संबंध भारताच्या अंतर्गत घडामोडींवर विदेशी संस्थांचा प्रभाव आणि अशा संबंधांचे राजकीय परिणाम दर्शवतात.

भाजपने दावा केला की राजीव गांधी फाऊंडेशनच्या अध्यक्षपदामुळे सोनिया गांधींची जॉर्ज सोरोस फाऊंडेशनशी भागीदारी झाली. ती भारतीय संस्थांवर विदेशी निधीचा प्रभाव दर्शवते. या मुद्द्यावर पक्षाचे सुधांशू त्रिवेदी यांनी पुन्हा पत्रकार परिषद घेऊन हा अत्यंत गंभीर विषय असल्याचे सांगितले. हा प्रश्न राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आहे. परकीय शक्तींशी असलेल्या काँग्रेस पक्षाच्या या युतीमुळे देशाची सुरक्षा धोक्यात आली आहे. काँग्रेसचे माजी नेते नटवर सिंह यांनीही सोनिया गांधी यांना उद्देशून लिहिले होते की पक्षात विदेशी शक्ती सक्रिय आहेत. काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी जाहीरपणे जॉर्ज सोरोस यांचा जुने मित्र असा उल्लेख केला होता. या पार्श्वभूमीवर सोरोस हे सध्या भारतीय राजकारणात वादाचा विषय झाले आहेत. अर्थात हे पहिल्यांदाच घडत आहे किंवा सोनिया गांधी आणि सोरोस यांच्यावर पहिल्यांदाच आरोप होत आहेत असे नाही. भारतीय जनता पक्षाने गांधी कुटुंबासह काँग्रेस पक्ष आणि त्यांचे प्रमुख नेते राहुल गांधी यांच्यावर टीका करण्यासाठी सोरोस याचे नाव घेतले.

भाजपने राहुल गांधी देशद्रोही असल्याचा आरोप केला आणि काँग्रेस पक्ष कथितपणे भारताविरुद्ध सोरोस यांचा अजेंडा पुढे रेटत असल्याचा आक्षेप घेतला. भाजपचे हे आरोप जॉर्ज सोरोस यांच्याशी संबंधित वादांच्या जागतिक गाथेतील एक उदाहरण आहे. 'ओपन सोसायटी फाऊंडेशन' (ओएसएफ) च्या माध्यमातून त्याच्या आर्थिक शोषणापासून परोपकारी उपक्रमांपर्यंत सोरोस प्रशंसा आणि टीका या दोन्हींच्या केंद्रस्थानी आहेत. सोरोस याचा जन्म १२ ऑगस्ट १९३० रोजी हंगेरीच्या बुडापेस्ट येथे झाला. नाझी राजवटीत तो ज्यू कुटुंबात वाढला. तो आपली ओळख लपवून होलोकॉस्ट (नाझी जर्मन राजवटीत केलेले ज्यूंचे राज्य-प्रायोजित हत्याकांड) मधून वाचला आणि नंतर इंग्लंडला गेला. त्याने 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' मध्ये शिक्षण घेतले आणि तत्त्वज्ञ कार्ल पॉपर आणि त्यांच्या ओपन सोसायटीच्या विचारांनी खूप प्रभावित झाला. १९७० मध्ये सोरोसने सोरोस फंड मॅनेजमेंट या हेज फंडची स्थापना केली. त्यातून त्याला प्रचंड संपत्ती मिळाली. त्याची सर्वात वादग्रस्त आर्थिक चाल १९९२ मध्ये आली, जेव्हा त्याने ब्रिटिश पौंडविरुद्ध पैज लावली आणि एका दिवसात एक अब्ज पौंडपेक्षा जास्त कमाई केली. यामुळे त्याला 'द मॅन हू ब्रोक द बँक ऑफ इंग्लंड' असे टोपणनाव मिळाले. सोरोसने त्याच्या आर्थिक जाणकारांसाठी जागतिक ख्याती मिळवली असली तरी त्याच्या चाली अर्थव्यवस्था अस्थिर करतात, अशी टीका केली गेली आहे.

'ओपन सोसायटी फाऊंडेशन'च्या माध्यमातून सोरोसने जगभरातील लोकशाही, अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांसाठी ३२ अब्ज डॉलरहून अधिक देणगी दिली आहे. त्याच्या फाऊंडेशनने कम्युनिस्टोत्तर युरोपमधील नागरी समाज प्रकल्पांना तसेच अमेरिका आणि इतरत्र प्रगतीशील चळवळींना निधी दिला आहे. सोरोसने हुकूमशाही शासन, उत्पन्न असमानता आणि हवामानबदल या मुद्द्यांवरही आवाज उठवला आहे. तथापि, विरोधकांचा असा युक्तिवाद आहे, की सोरोस आपली संपत्ती राजकीय कथांना आकार देण्यासाठी आणि परोपकाराच्या नावाखाली सार्वभौमत्व हडपण्यासाठी वापरत आहे. २०२० मध्ये, दावोस येथील 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'मधील भाषणादरम्यान सोरोसने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरकारवर उघडपणे टीका केली. तेव्हापासून तो भाजपच्या रडारवर आहे. सरकार एकाधिकारशाहीला प्रोत्साहन देत असल्याचा आरोप त्याने केला. सोरोसने नागरिकत्व दुरुस्ती कायदा आणि जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवण्यावर टीका केली आणि मोदी सरकारवर फूट पाडणारी धोरणे राबवल्याचा आरोप केला. जागतिक स्तरावर लोकशाहीला धोका निर्माण करणाऱ्या राष्ट्रवादी नेत्यांपैकी एक या शब्दांमध्ये त्याने मोदी यांचा उल्लेख केला. त्याच्या वक्तव्यावर भारतीय नेते आणि टीकाकारांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. भारताच्या देशांतर्गत व्यवहारात परकीय हस्तक्षेप असल्याची त्याची टिप्पणी भाजपने स्पष्टपणे नाकारली. सोरोसच्या 'ओपन सोसायटी फाऊंडेशन' (ओएसएफ) वर भारतातील सरकारी धोरणांचा विरोध करणाऱ्या 'एनजीओ' आणि कार्यकर्त्यांना निधी पुरवल्याचा आरोप आहे. त्याच्या संस्थेने 'सीएए' आणि २०२० च्या कृषी कायद्यांविरोधातील निदर्शनांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याचा आरोप टीकाकार करतात. भारतीय एजन्सींनी 'ओएसएफ'शी संबंध असल्याचा संशय असलेल्या 'एनजीओं'चा तपास करत देशविरोधी कारवायांद्वारे देशाला अस्थिर करण्याचा आरोप केला आहे. काही भारतीय समालोचक आणि उजव्या विचारसरणीच्या गटांनी दावा केला आहे की सोरोसचा निधी अप्रत्यक्षपणे खलिस्तान राज्याचा पुरस्कार करणाऱ्यांसह फुटीरतावादी चळवळींना समर्थन देतो. या दाव्यांचे थेट पुरावे नसले, तरी आरोपांमुळे भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणारा म्हणून सोरोसची प्रतिमा मजबूत झाली आहे. 'ओएसएफ'सारख्या संस्थांच्या कथित विदेशी हस्तक्षेपाला प्रतिसाद म्हणून भारत सरकारने 'फॉरेन कॉन्ट्रिब्युशन रेग्युलेशन ॲक्ट'अंतर्गत नियम कडक केले आहेत. विदेशी निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी अनेक स्वयंसेवी संस्थांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. भाजप सातत्याने सोरोसचा संबंध काँग्रेस पक्षाशी जोडतो आहे. राहुल गांधी हे भारताला अस्थिर करण्याच्या सोरोसच्या अजेंड्याशी संबंधित असल्याचा आरोप भाजपने केला आहे. भाजपचा असा दावा आहे, की ज्या मुद्द्यांवर काँग्रेस पक्ष भारत सरकारच्या धोरणांवर टीका करतो, ते सोरोस अनुदानित संस्थांद्वारे प्रसारित केलेल्या आंतरराष्ट्रीय कथनाशी जुळतात.

राहुल यांना सर्वोच्च देशद्रोही संबोधत भाजपने देशांतर्गत राजकीय असंतोषाला परकीय हस्तक्षेपाशी जोडण्याचा प्रयत्न केला असून सोरोसला या कथित षडयंत्रातील प्रमुख खेळाडू मानले आहे. सोरोसच्या आर्थिक कारनाम्यांमध्ये १९९२ च्या 'ब्लॅक वेन्सडे क्रायसिस'चाही समावेश आहे. त्यासाठी त्याच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका झाली होती. पैसा कमावण्यासाठी विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था अस्थिर केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. १९९७ च्या आशियाई आर्थिक संकटादरम्यान सोरोसवर चलन व्यापाराद्वारे आर्थिक अस्थिरता वाढवल्याचा आरोप होता. त्याच्यावर इमिग्रेशन, 'एलजीबीटीक्यू' अधिकार आणि इतर देशांमधील सरकारविरोधी निदर्शकांना निधी देऊन राजकारणात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. हंगेरी आणि रशियासारख्या देशांनी त्याच्यावर त्यांच्या देशांतर्गत राजकारणात हस्तक्षेप केल्याचा आरोप केला आहे, तर उजव्या विचारसरणीचे नेते त्याला जागतिक स्तरावर राष्ट्रीय सार्वभौमत्वासाठी धोका मानतात. सोरोस अनेकदा कट सिद्धांतांच्या केंद्रस्थानी असतो. त्याच्यावर स्वत:चा राजकीय अजेंडा पुढे नेण्यासाठी संकटे भडकवल्याचा आरोप केला जातो. सोरोस हे अत्यंत वादग्रस्त व्यक्तिमत्व आहे. त्याचे समर्थक सोरोसला एक धूर्त आणि शक्तिशाली अब्जाधीश मानतात. गौतम अदानीबाबत सरकारला घेरण्याचा प्रयत्न करणारी काँग्रेस सोरोसच्या मुद्द्यावर अलिकडे कोंडीत सापडली. सोरोसच्या निमित्ताने भाजपने काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वाला गोत्यात उभे केले आहे. या प्रश्नाला कसे सामोरे जायचे, हे काँग्रेसला समजत नाही.

आजकाल

# शेतमालाचा वायदे बाजार कोणाच्या हातात?

**संजीव चांदोरकर**

गहू, सोयाबीन, चणे, मूग अशा सात शेती मालाच्या वायद्यांवर (फ्युचर्स कॉन्ट्रॅक्ट) गेली तीन वर्ष बंदी घातलेली आहे. ती २० डिसेंबर २०२४ ला संपणार होती.

ती बंदी सेबी या वायदे बाजाराच्या नियमक मंडळाने ती ३१ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवली आहे.

त्यानिमित्ताने.

शेतीमालाच्या मंडीमध्ये खरेदी विक्रीचे व्यवहार होतात आणि कमोडिटी मार्केटमध्ये देखील होतात.

शेतीमालाच्या मंडित एका हाताने शेतीमाल दीला जातो, व दुसऱ्या हाताने पैसे घेतले जातात. डेरीव्हेटीव्ह मार्केट मधील खरेदी करणारा देखील पैशामधेच बोली लावतो व विकणारा देखील पैशातच बोलतो.

डेरीव्हेटीव्ह मार्केटमधे सामील होण्यासाठी तुमच्याकडे फक्त पैसे हवेत व जोखीम घेण्याची तयारी हवी. विकण्यासाठी माल नको, खरेदी केल्यावर साठवण्यासाठी गोदामे नकोत, तो सडला, नासला याची चिंता नको. त्यामूळे डेरीव्हेटीव्ह मार्केटमध्ये सामिल होणाऱ्यांची संख्या कितीही वाढू शकते; आणि आजच्या डिमॅट आणि इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मच्या युगात तुम्ही चंद्रावरून देखील भाताची/सोयाबीनची खरेदीविक्री करू शकता.

जेथे जेथे खरेदी विक्रीचे व्यवहार होतात तेथे तेथे हायपोथेटिकली सट्टेबाजीला वाव असतो; आणि गेल्या काही दशकात वित्त भांडवलाने जगातील अशी एकही संधी सोडली नाहीये. हे फक्त शेतीमालाचे नाही; खनिज तेलाच्या भावावर मध्य पूर्वेतील उत्पादक देश कमी अमेरिकेतील गोल्डमन सॅक्स अधिक प्रभाव टाकत असते

अनेक प्रकारची खनिजे, सोने, पोलाद सारखे धातू, रबर, चहा सारखी प्लांटेशन्स, अनेक प्रकारचे अन्नधान्य, परकीय चलन, व्याजदर, शेअर्स, रोखे सर्वांवर डेरिव्हेटीव्ह आहेत. डेरिव्हेटिव्ह मार्केटमध्ये दररोज ट्रिलियन्स डॉलर्सचे खरेदी/विक्रीचे व्यवहार होतात; त्यांच्यातील कोणीही कशाचाच उत्पादक नसतो. टीका सट्टेबाजीपेक्षा वित्त भांडवलाच्या महाकाय ताकदीवर जास्त आहे; त्या ताकदीच्या जोरावर ते कशाचेही भाव आकाशाला भिडवू शकतात किंवा जमिनीत गाडू शकतात.

शासकीय धोरणकर्ते त्यांचेच असतात; शासन हे सगळे नैसर्गिक आहे असा आव आणते

खरतर वायदेबाजारात खरेदीदार/विक्रेत्यांना विन-विन परिस्थिती तयार केली जाऊ शकते; जोखीम व्यवस्थापनासाठी विधायकपणे वापरता येऊ शकतो.

त्यासाठी वायदे बाजारांमधील वित्त भांडवलाची पकड ढिली करण्यासाठी धोरणे आणि नियम बनवण्याची गरज आहे. पण जागतिक वित्त भांडवलाने आधुनिक भांडवली अर्थव्यवस्थेतील अनेक विधायक संकल्पनाना आपली बटीक बनवली आहे त्यातील एक शेतीमालाचे वायदेबाजार ज्यांनी जन्मापासून एकदाही मातीत हात घातलेला नसतो असे वित्तीय क्षेत्रातील सुटेड बुटेड लोक कुठे होती गरीब शेतकरी पिकवत असलेल्या अनेक शेतमालाच्या भावावर निर्णायक प्रभाव पाडतात.

शेतीमालाच्या (आणि इतर अनेक वस्तुमालाच्या/कमोडिटीच्या) वायदेबाजारावर शेतकऱ्यांची (आणि प्रत्यक्ष उत्पादन करणाऱ्यांची) नव्हे तर वित्त भांडवलाची घुस्मटवून टाकणारी पकड असते. हि आपली वायदेबाजारावरील राजकीय आर्थिक (पोलिटिकल इकॉनॉमिक) टीका आहे

ते जे दाखवतात सांगतात त्यातील काहीही फेस व्हॅल्यू वर घेऊ नका. त्यामागील पॉलिटिकल इकॉनोमी समजून घ्या. ज्यावेळी पॉलिटिक्स /पॉलिटिकल असा शब्दप्रयोग आपण करतो त्यामध्ये ''पॉवर इक्वेशन्स'' किंवा ''पॉवर डायनॅमिक्स'' वर चर्चा करणे अनुस्युत असते. गेली ४० वर्ष चालू नवउदारमतवादी अर्थव्यवस्थेतील जर कोणत्या एका शब्दावर चर्चा करणे टाळत असतील तर तो विषय आहे अर्थव्यवस्थेतील ''पॉवर इक्वेशन्स'' किंवा ''पॉवर डायनॅमिक्स''

सतत त्या विषयावर चर्चा, लोकशिक्षण केले पाहिजे. वायदेबाजाराच्या निमित्ताने अजून एक पोस्ट

जगातील सर्वच वायदेबाजार कसे सट्टेबाज वित्त भांडवलाच्या आहारी गेले आहेत हे अभाय्साण्यासारखे आहे अमेरिकेतील दादा वित्त संस्थांनी मृत्यूचा वायदेबाजार उभा करण्याचा घाट घातला होता !

२००१ साली ट्वीन टावर्सवर अविश्वसनीय पध्दतीने हल्ला झाला व अमेरीकन सरकार, अमेरीकन समाजच नाही तर सारे जग हादरले होते हे आपल्याला माहीत आहे. अमेरिकेतील वित्तीय क्षेत्राने या हल्ल्यातून तयार झालेली अनिश्चितता, त्यातून तयार झालेली जोखीम यावर एक डेरिव्हेटीव्ह प्रॉडक्ट बनवण्याचा घाट घातला.

देशात होणॉया आतंकवादी हल्यात किंवा समाजधुरीणांवर (राजकीय नेते, कॉरपोरेट प्रमुख) होणाऱ्या खूनी हल्ल्यातील संभाव्यतेवर आधारीत एक वित्तीय प्रपत्र, एक डेरीव्हेटीव्ह, तयार केले गेले. त्याचा उद्देश असा होता की अशा घटनांमधे जी जोखीम असते तिला तोंड देण्यासाठी गुंतवणूकदार अशा डेरीव्हेटीव्हचा वापर करू शकतील. हे डेरीव्हेटीव्ह व त्याला लागणारे सॉफ्टवेअर विकसित करण्यासाठी ८ मिलीयन डॉलर्स ( ६० कोटी रूपये) खर्च केले. समजा पुढच्या वर्षी अमेरिकेतील अमुक ठिकाणी आतंकवादी यावर किंवा अमेरिकन राष्ट्राध्यक्षांवर प्राणांतिक हल्ला होणार कि नाही यावर मिलियन्स डलर्सच्या पोझिशन घेतल्या गेल्या तर आपला नफा व्हावा य उद्देशाने पोझिशन घेणारे स्वतःच फंडिंग करून तशी घटना घडवून अनु शकतात , ते कोणत्याही थराला जावू शकतात,

अशी टीका अमेरिकन संसदेत झाली आणि खूप गदारोळानंतर सरकारला ती वेबसाईट बंद करणे भाग पडले. हे वॉल स्ट्रीट वाल्याना कळत नव्हते असे नव्हे तर ते स्वार्थ आंधळे आहेत. लक्षात घ्या हे हायपोथेटिकल नाहीये; हे होतंय.

उद्या गोल्डमन सॅक्स ने पोलादाचे भाव वाढतील म्हणून मिलियन्स डॉलर्सची लॉन्ग पोझिशन घेतली तर पोलाद आपल्या गोडाऊन मध्ये साठवून, पोलादाची कृत्रिम टंचाई करून, भाव वाढतील हे बघून, नफा कमावू शकतात. जिज्ञासूंनी गोल्डमन सॅक्स ने अल्युमिनियमचे भाव कमोडिटी डेरिव्हेटीव्ह मध्ये वाढवण्यासाठी काही वर्षांपूर्वी काय केले याची माहिती गुगलवर घ्यावी.

लोकसंसद

## परप्रांतीयांची मुजोरी मोडून काढा

परप्रांतियांना दिली ओसरी, परप्रांतीय हातपाय पसरी अशी महाराष्ट्राची अवस्था झाली आहे. ज्या परप्रांतियांना मराठी माणसांनी मोठ्या मनाने महाराष्ट्रात आसरा दिला तेच परप्रांतीय आता मराठी माणसालाच महाराष्ट्रातून हद्दपार करायला निघाले आहेत. जी मुंबई मिळवण्यासाठी १०६ मराठी हुतात्म्यांनी आत्मबलिदान दिले त्याच मुंबईत मराठी माणसांना घर मिळत नाही. अशी पाटी मुंबईत वाचायला मिळते. आपण खरोखरच महाराष्ट्रात राहतो का? असा प्रश्न पडतो. कारण पुण्या - मुंबई सारख्या शहरातच नव्हे तर ग्रामीण भागातही परप्रांतीयांनी अतिक्रमण केले आहे. नोकरी असो वा व्यवसाय सर्वत्र परप्रांतीयांची रेलचेल दिसते. परप्रांतीय मतांच्या तव्यावर राजकारणाची पोळी भाजून घेता येते म्हणून राजकारणी या परप्रांतियांना अभय देतात त्यांना पाठीशी घालतात. मतांसाठी राजकारणी आपल्याला पाठीशी घालणारच आहेत हे माहीत असल्यानेच परप्रांतीयांची मुजोरी वाढली आहे. ही मुजोरी इतकी वाढली की ते थेट मराठी माणसांना भाडोत्री गुंडांकरवी मारहाण करू लागले आहेत. काही परप्रांतीय तर पोलिसांनाही जुमानित नाहीत म्हणूनच या मुजोर परप्रांतीयांची मुजोरी मोडून काढली पाहिजे त्यासाठी मराठी माणसांनी आपली अतिविनयशिल वृत्ती सोडून खळ्ळखट्याकचा मार्ग स्वीकारावा कारण त्यांना तीच भाषा समजते. मराठी माणसांनी या मुजोर परप्रांतियांना रोखण्यासाठी एक होणे गरजेचे आहे. दक्षिणेकडील राज्ये जशी आपल्या अस्मितेसाठी कठोर भूमिका घेतात तशी कठोर भूमिका मराठी माणसाने मराठी अस्मितेसाठी घ्यायला हवी.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**२४ डिसेंबर**

**१८८५ :-** व्याकरणकार मोरेश्वर सखाराम मोने यांचा जन्म. पेशाने अध्यापक तसेच एक डोळा अधू असूनही त्यांनी 'मराठी भाषेचे व्याकरणकार' व 'व्याकरणप्रबंधकार' हा ग्रंथ लिहिला. यात व्याकरण, व्युत्पत्ति, छंदशास्त्र आदींचा आढावा घेऊन त्या शाखांसाठी कोणी कोणते काम केले याची माहिती देताना त्यांनी अभ्यासपूर्वक चरित्रेही दिली आहेत. या व्यतिरिक्त मराठी साहित्य व व्याकरण' हे एक त्याचं आणखी एक महत्त्वपूर्ण पुस्तक. **१८९८ :-** अर्थतज्ञ, शिक्षणतज्ञ, सहकार क्षेत्रातील एक विचारवंत, लेखक दत्तात्रय गोपाळ कर्वे यांचा जन्म. बरेचसे लेखन इंग्रजीतून तथापि अर्थशास्त्राची मुलतत्त्वे मराठी वाचकांना सोप्या व सुलभ भाषेत समजावून दिली आहेत तर भारतीय अर्थशास्त्र हा न्या. रानड्यांच्या इंग्रजी निबंधाचा अनुवाद आहे. तसेच हिंदी कारखाने या पुस्तकातून कारखानदारी कशी फायदेशीर ठरणार आहे याचे विवेचन केले आहे. **१८९९ :-** साहित्यिक, समाजवादी नेते, समाजसुधारक पांडुरंग सदाशिव तथा साने गुरुजी यांचा जन्म. 'कला म्हणजे काय?', 'मानव जातीची कथा', 'राष्ट्रीय हिंदुधर्म', 'दिल्ली डायरी', 'ना खंत ना खेद' याशिवाय 'भारताचा शोध', अनेक चरित्रपुस्तके', 'गोड गोष्टी', '१४ अनुवादित ग्रंथ', 'भारतीय संस्कृती' हा लेखसंग्रह, सुंदर पत्रे', 'श्यामची आई' हे इतिहास घडवणारे पुस्तक, अशी त्यांची ग्रंथसंपदा. **१९०९ :-** साहित्यिक रघुवीर जगन्नाथ सामंत यांचा जन्म. त्यांच्या साहित्यसंपदेत 'वाळूतील पावले' हे (कथाशब्दचित्रे), 'तारांगण' (अभिनवचित्र), 'तारांगण' (अभिनवचित्र), 'ताडा' हा कथासंग्रह आणि 'जीवनगंगा', 'आम्ही खेडवळ माणसं', 'आम्हांला जगायंच' या कादंबऱ्या मिळून ३० पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९२९ :-** लेखक प्रा. डॉ. सुरेशचंद्र गंगाधर नाडकर्णी यांचा जन्म. लेखक क्रिडा समीक्षक असून प्राणीशास्त्रांवर इंग्रजीतून लेखन याशिवाय उर्दूतून लेखन केले आहे. 'गजल' ह्या ग्रंथातून गजल म्हणजे काय? तसेच उर्दू शायरांच्या रचना व त्यावरील भाष्य याशिवाय 'जीवशास्त्राची प्रस्तावना' हा आणखी एक ग्रंथ त्याच्या नावावर आहे. **१९३३ :-** लेखक वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक डॉ. नरसिंह अच्युत दाभोलकर यांचा जन्म. मराठी शब्दकोशाच्या संपादक मंडळावर कार्यरत असणाऱ्या दाभोलकरांनी 'अनुशासन गीता',, तसेच 'वेदांत विचार दर्शन' ह्या ग्रंथातून भारतीय तत्त्वज्ञानातील संकल्पनांचा वैज्ञानिक दृष्टीकोनातून अर्थ सांगितला आहे. **१९३६ :-** कथा - कादंबरीकार अनंत दत्तात्रय तिबिले यांचा जन्म. सौ. उर्मिला तिबिले या नावाने सुमारे २५० रहस्यकथा त्यांनी लिहिल्या. तसेच 'गुप्तदूत' या नावाने पाच हिंदी रहस्य कादंबरी याशिवाय 'अखेर जमलं पण', 'अग्निदिव्य', 'आग', 'वैर', 'शापित राजहंस' मिळून पन्नास एक कादबऱ्या त्याच्या नावावर आहेत. **१९४६ :-** नाटककार श्रीनिवास जगन्नाथ भणगे यांचा जन्म. अनेक एकांकिका आणि 'अरे अश्वत्थामा', 'त्या रात्री एक वाजता', 'शांतेचं कार्ट चालू आहे' आदी नाटके, तसेच 'तुझ्या गळा', 'समांतर' या कादंबऱ्या आणि 'साक्षात्कार' हा कथासंग्रह त्यांच्या नावावर आहे. **१९५५:-** ललित लेखक, पत्रकार अंबरीश जयदेव मिश्रा यांचा जन्म. कलावंताची व्यक्तिचित्रे रेखाटणारे 'शुभ्र काही जीवघेणे' तसेच गांधीजीविषयीचे 'गंगेमध्ये गगन वितळले' ही त्यांची लोकप्रिय पुस्तके. **२००० :-** ज्येष्ठ कथालेखक व कादंबरीकार आनंद विनायक जातेगावकर यांचे निधन. जातेगावकर यांच्या का 'सत्यकथा' मासिकात प्रसिध्द होत असत. 'सत्यकथा' व 'मौज' दिवाळी अंकातून ७० ते ८० च्या दशकात प्रकाशित झालेल्या त्यांच्या कथांचा 'मुखवटे' हा संग्रह प्रसिध्द आहे. 'मुखवटे' मधल्या सर्व कथांमधून मध्यमवर्गीयांचे चाकोरीबध्द जीवन त्यांनी रंगविले. 'फ्रांज काफ्ता' यांच्या 'ट्रायल' या कादंबरीवर आधारित 'कैफियत', 'गोपिकाबाईंची बखर', 'व्यासांचा वारसा' या त्यांच्या कादंबऱ्याही प्रसिध्द आहेत. 'अस्वस्थ वर्तमान' ही कादंबरीही त्यांनी नुकतीच लिहिली होती. अशी साहित्यसंपदा प्रकाशित. **२००९ : -** पुरोगामी विचारवंत भा. ल. भोळे यांचे निधन. 'घटना दुरुस्ती', 'दुसरे स्वातंत्र्य', विचार प्रवर्तक ग्रंथ त्यांनी लिहिले.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# ठाण्यातील चौकाचौकात मृत्यूचे सापळे

## अनधिकृत होर्डिंगवरून न्यायालयाने ठामपाला झापले

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

**ठाणे शहरातील भल्यामोठ्या ४९ अनधिकृत होर्डिंगवर कागदोपत्री कारवाईचा दिखावा करणाऱ्या ठाणे महापालिका प्रशासनाला उच्च न्यायालयाने शुक्रवारी फटकारले आहे. तसेच, पालिकेला शपथपत्र सादर करण्यास सांगून ठोस कारवाईचे आदेश दिले आहेत.**

घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेनंतर ठाणे महापालिकेने बेकायदा होर्डिंगवर कारवाई केली होती. मात्र, ठाणे महापालिकेने किती फलकांवर काय कारवाई केली याबाबत संदिग्धता होती. दरम्यान, ठाणे महापालिका आयुक्तांना निवेदन देऊन गेली अनेक वर्षे पालिकेची फसवणूक करणाऱ्या होर्डिंग व्यवसायिकांसह चुकीचा स्थळ पाहणी अहवाल देणाऱ्या जाहिरात विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. परंतु, पालिकेकडून कारवाईबाबत कोणतेचे पाऊल उचचले गेले नाही. त्यामुळे पालिकेच्या निष्क्रिय कारभाराला कंटाळून वकील सागर जोशी यांच्यामार्फत संदीप पाचंगे यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्यात त्यांनी पालिकेने ४९ जाहिरात फलक कंपन्यांना ११ कोटी रूपयांचा दंड ठोठावला होता. तसेच, वसूल करायला सात दिवसांची वेळ दिली होती. मात्र, महापालिका राजकीय दबावामुळे कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप पाचंगे यांनी केला होता. त्यावर शुक्रवारी (दि.२०) झालेल्या सुनावणीत महापालिकेची बाजू मांडणारे वकील मंदार लिमये यांना कोर्टाने खडेबोल सुनावले आहेत.

न्यायलयाकडून ठामपाला अनधिकृत ४९ होर्डिंगवर काय कारवाई केली, याची माहिती सादर करण्यास सांगण्यात आले होते. मात्र, फलकांचा वाढीव आकार कमी करण्याचे आदेश देण्याशिवाय पालिकेने काहीच कारवाई केलेली नाही. काही जाहिरात कंपन्यांकडून वारंवार नियमांचे उल्लंघन करून भलेमोठे फलक लावण्यात आले आहेत. पालिका अकार्यक्षम आहे किंवा होर्डींग व्यवसायात भागीदार आहे, असे कडक ताशेरे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने ओढले आहेत. तसेच, न्यायलयाने आता संपूर्ण ठाणे शहरातील जाहिरात फलकांबाबत काय कारवाई करणार आहात, याचे शपथपत्र पुढील तारखे आधी देण्याचे सांगितले आहे.

सेंट झेवियर्स स्कूल जवळ, आझादनगर



सर्व्हिस रोड, ब्रम्हांड, आझादनगर



### कठोर अंमलबजावणी करण्याची गरज

**ठाणे महापालिकेने प्रत्यक्षात किती फलकांवर कारवाई झाली आणि उर्वरित फलकांचे काय झाले याबाबत स्पष्टता नव्हती. या कारवाईमुळे बेकायदेशीर होर्डिंग रोखण्यास मदत होईल आणि शहराचे सौंदर्यही टिकून राहील. तसेच, नागरिकांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होणार नाही. होर्डिंग्जच्या नियंत्रणाबाबत ठोस धोरण आखण्याची आणि त्याची कठोर अंमलबजावणी करण्याची गरज असल्याचे मत संदीप पाचंगे यांनी व्यक्त केले आहे.**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ डिसेंबर

१) श्री.प्रफुल्ल पंढरीनाथ राऊत चेंढरे-अलिबाग २४-१२-१९४२

२) श्री. प्रदीप मधुकर महाडेश्वर अलिबाग, २४-१२-१९५१

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**स्व. श्री. भूपेंद्र मोहनलाल देढीया, स्मरणार्थ, नालासोपारा**



**स्व. श्री नानागिर ग. गोसावी, १० वी पुण्यतिथी, अलिबाग**



**श्री. निलेश दत्तात्रय घरत, द्वितीय स्मृतिदिन अलिबाग**

## बुलढाण्यातील लोणारे रूग्णालयात आग

### रूग्णाचा होरपळून मृत्यू

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

बुलढाण्यातील लोणार ग्रामीण रुग्णालयात आग लागल्याची घटना घडली आहे. सोमवारी (दि.२३) पहाटे ३.२० वाजण्याच्या सुमारास सामान्य रुग्णांच्या वॉर्डमध्ये ही आग लागली होती. या आगीत एका रुग्णाचा होरपळून मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. हरिभाऊ बापुजी रोकडे असे मयत रुग्णाचे नाव आहे.





हरिभाऊ रोकडे हे शहरातील बसस्थानकात रविवारी झोपलेले आढळल्यानंतर बसस्थानक वाहतूक नियंत्रकाने १०८ नंबरवर फोन केला. यानंतर हरिभाऊ यांना लोणार ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले होते. तेथे त्यांची तपासणी करून त्यांना बुलढाणा येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्याचे सांगण्यात आले होते. मात्र, त्यांच्यासोबत कुणीही नातेवाईक नसल्याने पोलिसांना माहिती देत त्यांना ग्रामीण रुग्णालयातच ठेवण्यात आले होते.

दरम्यान, रुग्णालयात रात्रीच्या वेळेला ड्युटीवर तैनात असलेले सुरक्षारक्षक उद्धव वाटसर यांना सोमवारी पहाटे रुग्णांच्या कक्षातून धूर येत असल्याचे दिसले. त्यांनी तात्काळ याबाबत रुग्णालयातील संबंधितांना सांगितले. यानंतर शर्थीचे प्रयत्न करत आग आटोक्यात आणली होती. परंतु, हरिभाऊ यांच्या बेडलाच लागून आग लागली असल्यामुळे त्यात त्यांचा जळून मृत्यू झाला आहे.

ही आग नेमकी कशामुळे लागली हे समजू शकलेले नाही. मात्र, हरिभाऊ यांना विडी ओढण्याचे व्यसन होते. त्यामुळे विडीमुळे आग लागली की शॉर्टसर्किट झालं याबाबत तपास सुरू आहे. दरम्यान, वेळीच आगीवर नियंत्रण मिळवल्याने पुढील अनर्थ टळला आहे.

## बुद्धमूर्ती अन्यत्र हलवण्यास विरोध

**रत्नागिरी :** डीएसपी बंगल्यानजीक थिबा राजाच्या कालावधीतील बुद्धमूर्ती आहे. ती मूर्ती हलवण्याबाबत निर्णय घेण्याच्या हालचाली सुरू आहेत. मात्र, तेथील बुद्धमूर्ती अन्यत्र हलवू नये, अन्यथा बौद्ध अनुयायांतर्फे उग्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. येथील रत्नागिरी कार्यालयाच्या मागील बाजूस बुद्धमूर्ती आहे. त्या जागेत कम्युनिटी सेंटर विकसित करण्याकरिता प्रशासनाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. मात्र, पालिका प्रशासनाबरोबर २४ डिसेंबरला होणाऱ्या चर्चे आधीच बौद्ध समाजाकडून मूर्ती स्थलांतरित करण्यास तीव्र विरोध होत आहे.

## पालकमंत्रीपदावरून राऊतांनी सत्ताधाऱ्यांना फटकारले

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महायुती सरकारने मुख्यमंत्रीपद, मंत्रीमंडळ विस्तार, खातेवाटपाला महिनाभराचा कालावधी घेतल्यानंतर आता जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदावरून आता नेत्यांमध्ये रस्सीखेंच सुरू आहे. या सर्वादरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुन्हा एकदा त्यांच्या दरे या मूळ गावी विश्रांतीसाठी गेले आहेत. त्यावरून शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी त्यांना टोला लगावला आहे.



संजय राऊत म्हणाले की, उपमुख्यंत्र्यांची तब्येत पुन्हा बिघडली असून ते त्यांच्या गावी गेले आहेत. त्यांची तब्येत सतत बिघडत असते त्यामुळे मला त्यांची काळजी वाटते. फडणवीस साहेबांनी त्यांच्यावर काय जादू केली माहित नाही. पण एवढे धष्टपुष्ठ व्यक्ती सतत कसे आजारी पडतात, असा खोचक सवाल त्यांनी केला आहे. तसेच, पालकमंत्रीपदावरून देखील त्यांनी सत्ताधाऱ्यांना फटकारले आहे. आघाडी किंवा युतीच्या सरकारमध्ये शेवटपर्यंत अशा गोष्टी होत असतात. त्याला कुणी अपवाद नाही. मुंबईचे पालकमंत्रीपद कुणालाही मिळाले तरी मराठी माणसाला घरं स्वस्त मिळणार आहे का, असा सवालही संजय राऊत यांनी केला आहे.

पुढे बोलताना म्हणाले की, बीडचे पालकमंत्रीपद कोणत्याही मुंडे यांना मिळाले तरी संतोष देशमुखला न्याय मिळणार आहे का? परभणीचे पालकमंत्रीपद कुणालाही मिळाले तरी सोमनाथ सुर्यवंशीला न्याय मिळणार का? प्रत्यक्षात पालकमंत्रीपदाचा काही उपयोग नसतो. त्यानिमित्ताने त्या त्या जिल्ह्याची सत्ता आणि आर्थिक व्यवहाराची सूत्र आपल्याकडे राहावी. म्हणून पालकमंत्रीपद पाहिजे असते. अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.

## आदिवासी मातेंवर मृत्यूचा फेरा

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर जिल्ह्यात बालमृत्यूपाठोपाठ आता मातामृत्यूच्या आकड्यातही लक्षणीय वाढ झाल्याचे समोर येत आहे. २०१४ पासून ते आतापर्यंत तब्बल १५५ मातांचा मृत्यू झाला आहे. या वर्षात पालघर जिल्ह्यात २० मातांचा मृत्यू झाला होता. मातामृत्यूचे सर्वाधिक प्रमाण पालघर तालुक्यात असून त्या खालोखाल डहाणू, जव्हार व विक्रमगड तालुक्यात महिला दगावल्या आहेत. मुदतपूर्व प्रसूती, कमी वयात विवाह, शारीरिक समस्या यासह गर्भधारणेच्या समस्या त्यातच योग्य तो पोषण आहार न मिळाल्यामुळेही मृत्यूच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे उघड झाले आहे.

पालघर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात बालविवाहसारख्या अनिष्ट रुढी परंपरा आजही कायम आहेत. अशा प्रकारांमुळे लहानपणीच शारीरिक अडचणी निर्माण झाल्याने स्तनदा व गर्भवती मातांचे मृत्यू होत असल्याचे तज्ज्ञ सांगत आहेत. अनेक उपाययोजना केल्यानंतरही ग्रामीण दुर्गम भागात बालविवाह होत आहेत. मातामृत्यू होऊ नये यासाठी महिला बालकल्याण विभागामार्फत सकस आहार, एपीजे अब्दुल कलाम आहार योजना अशा अनेक विविध योजना राबवल्या जातात. त्यानंतरही मातामृत्यू कायम आहे. २०२४ मध्ये ऑक्टोबरपर्यंत तब्बल १० मातांचे मृत्यू झाले आहे.

## जुने भाजीमार्केट पालिकेने पाडले

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

शहरातील धोकादायक बनलेल्या मच्छीमार्केट येथील जुनी भाजीमार्केटची इमारत पालिका प्रशासनाच्या पथकाने पाडली आहे. या भाजीमार्केट इमारतीच्या ठिकाणी पालिकेच्या मालकीची ३ कोटी रुपये खर्च करून नवी भाजीमार्केटची इमारत उभारली जाणार आहे.

बाजारपेठेतील जुन्या भाजीमार्केटची इमारत १९७५ ची असून, ती पूर्णपणे मोडकळीस आली होती. त्यामुळे रत्नागिरी पालिकेने येथील गाळेधारकांना मार्केट मोकळे करून देण्यासाठी कायदेशीर नोटीस बजावली; परंतु गाळेधारकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. पावसाळ्यात या इमारतीजवळ मोठा नोटीस बोर्ड लावून या मार्केटमध्ये येणाऱ्या-जाणाऱ्यांना धोकादायक इमारतीसंदर्भात सूचित करण्यात आले; परंतु याकडेही गाळेधारकांनी दुर्लक्ष केले. गाळेधारकांना पुन्हा नोटीस देऊन मार्केटमधील गाळे मोकळे करून देण्यास सांगितले. या नोटीसविरुद्ध शंकर पोतदार, दत्ता कनगुटकर, राजाराम पवार या तीन गाळेधारकांनी न्यायालयात धाव घेतली.



योग्य त्या कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केल्याखेरीज भाजीमार्केट इमारतीतील दुकान गाळ्यांचा कब्जा रत्नागिरी पालिकेने घेऊ नये किंवा इमारत पाडू नये यासाठी आदेश करण्याची विनंती न्यायालयाला करण्यात आली; परंतु न्यायालयाने कोणतीही स्थगिती न दिल्याने शुक्रवारी पालिकेच्या पथकाने मोडकळीस आलेली ही इमारत जेसीबी लावून पाडण्यास आली तेव्हा गाळेधारकांनी भाजीसह आपल्या वस्तू हलविल्या. त्यामुळे पथकाने जेसीबी आणि कामगारांच्या मदतीने इमारत पाडण्यास सुरू केले.

## परप्रांतीयांकडून मराठी कुटुंबावर हल्ला

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

चार दिवसांपूर्वी कल्याणच्या अजमेरा हाईट्स इमारतीत अखिलेश शुक्ला नावाच्या परप्रांतीय सरकारी अधिकाऱ्याने देशमुख कुटुंबावर हल्ला केल्याची घटना घडली होती. ही बातमी ताजी असतानाच पुन्हा कल्याणमध्येच उत्तम पांडे नावाच्या परप्रांतीयाने एका मराठी पोलीस कुटुंबाला बेदम मारहाण केली आहे. अल्पवयीन मुलीशी अश्लील चाळे केल्याचा जाब त्या कुटुंबाने पांडेला विचारताच त्याने पोलिसांसह त्याची पत्नी व आईवर हल्ला केला. या घटनेत पोलीस कुटुंब जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, परप्रांतीयांच्या या वाढत्या मुजोरीविरोधात कल्याण-डोंबिवलीत संतापाची लाट उसळली आहे.

अडिवली भागात राहणाऱ्या परप्रांतीय उत्तम पांडे (४०) याने पोलीस कर्मचाऱ्याच्या नऊ वर्षांच्या मुलीला घरात ओढत नेत तिच्यासोबत अश्लील कृत्य केले होते. याबाबत तिने आपल्या वडिलांना हा प्रकार सांगितला. त्यामुळे संतप्त झालेल्या या पोलीस कुटुंबाने पांडेला जाब विचारला. त्यावरून मुजोर पांडे व त्याच्या पत्नीने या पोलीस कुटुंबालाच शिवीगाळ करत त्यांच्यावर हल्ला चढवला. दरम्यान, पांडे व त्याची बायको रिनाने केलेला हल्ला या भागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. त्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला आहे. या मारहाणीत मुंबई पोलीस दलातील पोलीस कर्मचारी, त्यांची आई व पत्नी जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## महायुतीत काहीही अलबेल नाही

### नाना पटोलेंची महायुतीवर टीका

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

नागपूरमध्ये झालेल्या हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी रात्री खातेवाटप झाले आहे. आता महायुतीत पालकमंत्र्यासाठी कोणते जिल्हे घ्यायचे याची भांडणं होत आहेत. याबाबत मोठा दावा करत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी महायुतीवर टीका केली आहे.



नाना पटोले म्हणाले की, अजित पवार स्वतः म्हणत असतील की, मंत्रीपदं आणि खातेवाटपावरून काही लोक नाराज आहेत, तेव्हा याच्यापेक्षा अधिक काय पुरावा पाहिजे. हा एवढा मोठा पुरावा त्यांनी दिला आहे. त्यांना जनतेचे काय घेणे देणे नाही. या सरकारमध्ये काय गडबड सुरू आहे याच्यातून स्पष्ट होत आहे. महायुतीत काहीही आलबेल नाही, हे यावरून दिसून येत आहे, असे पटोले म्हणाले आहेत. ते पुढे म्हणाले की, महायुतीची परिस्थिती कौरवांसारखी आहे. आपसात लढून कार्यक्रम संपणार आहे. तसेच, मलाईदार खात्यांकरता संघर्ष होते. त्यामुळे हिवाळी अधिवेशनात हे खातेवाटप करू शकले नाही. शेवटच्या दिवशी त्यांनी खातेवाटप केले. त्यातही अनेकजण नाराज असल्याची चर्चा आहे. याचा अर्थ दाल में कुछ काला है, असेही नाना पटोले म्हणाले.

## ‘धनंजय मुंडेंची हकालपट्टी करा’

**। बीड । प्रतिनिधी ।**

बीडमधील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी धनंजय मुंडे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या परभणी येथील दौऱ्याच्या निमित्ताने नाना पटोले सोमवारी (दि.२३) सकाळी नांदेड येथे आले होते. त्यावेळी ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.

## ६८ वर्षांपर्यंत तरुण म्हणायचे का?

### भुजबळांचा अजित पवारांना टोला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आल्याने ते प्रचंड नाराज असताना आपल्याला डावलण्याम ागे नक्कीच काहीतरी गौडबंगाल असल्याचे ओबीसी नेत्यांचे स्पष्ट मत असल्याचे खुद्द भुजबळ यांनीच सांगितले आहे. तसेच, तरुणांना संधी देण्यासाठी वरिष्ठांना मंत्रिपद दिले नसल्याचे अजित पवार यांनी एका मेळाव्यात सांगितले होते. मात्र, तरुण म्हणजे किती वर्षांपर्यंत तरुण म्हणायचे? मग ६७ ते ६८ वर्षांपर्यंत तरुण म्हणायचे का?, असा टोलाही भुजबळ यांनी लगावला.




महायुती सरकारने नुकतीच मंत्रिपदाची यादी घोषित करताना ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्यासारख्या बड्या नेत्यांना डावलून धक्का दिला आहे. या पार्श्वभूमीवर मंत्रिपदापासून डावलल्यानंतर छगन भुजबळ यांनी राज्यभरातील ओबीसी नेत्यांची बैठक घेऊन संवाद साधला आहे. या बैठकीनंतर छगन भुजबळ यांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवारांबद्दलही नाराजी व्यक्त केली आहे. मला लोकसभा निवडणुकीचे तिकीट वेळेत दिले नाही म्हणून तेव्हा मी माघार घेतली. मात्र, आता पुन्हा लोकसभेवर जाण्यास सांगितले जात आहे. त्यामुळे विधानसभेवेळीच मला आधी सांगितले असते की निवडणूक लढवू नका तर निवडणूक लढवलीही नसती, असा संतापही भुजबळ यांनी व्यक्त केला.

### गडसंवर्धनासाठी ठोस पावले उचलण्याची गरज

# रत्नदुर्ग किल्ल्याच्या संरक्षणासाठी पुढाकार

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

**रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नदुर्ग किल्ल्याच्या संरक्षणासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे गडकिल्ले संवर्धन प्रतिष्ठानच्यावतीने निवेदन देण्यात आले आहे. यावेळी, रत्नदुर्ग किल्ल्यावर होत आसलेली अश्लील कृत्ये, मद्यपान व प्रेमीयुगुलांच्या रात्री-अपरात्रीच्या फेऱ्या थांबविण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीत जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी गडसंवर्धनासाठी ठोस पावले उचलण्याचे आश्वासन दिले आणि सविस्तर चर्चेसाठी लवकरच पुन्हा बैठक घेऊ, असे देखील सांगितले आहे.**



तसेच,किल्ल्यावरील झाडेझुडपांमुळे बुरूज व ऐतिहासिक वास्तूंना होणारे नुकसान रोखण्यासाठी नियमित स्वच्छता व संवर्धनाचे उपक्रम राबवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. या बैठकीला गडकिल्ले संवर्धन प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष दीपेश वारंग, महिलाध्यक्ष मानसी चव्हाण, संपर्कप्रमुख तन्मय जाधव, गडकिल्ले सेवक दीपक रेवाले, राजा कीर, विजय कळंबटे, सचिन कळंबटे, कीर्ती धामणे, शीतल श्रीखंडे, दीपक कडोलकर, शुभांगिनी जाधव, शशिकांत जाधव, स्वयम नायर, संध्या कोसुंबकर यांसह अनेक गावकरी व संघटनांचे सदस्य उपस्थित होते. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे जयदीप साळवी, धर्मजागरण दक्षिण रत्नागिरी संयोजक विजय यादव, हिंदू महासभेचे अध्यक्ष श्रीकांत मराठे आदींनी या कार्याला पूर्ण पाठिंबा असल्याचे सांगितले आहे.

### सूचनाफलक लावण्याचा प्रस्ताव

**रत्नदुर्ग किल्ल्याच्या पवित्र वास्तूत होत असलेल्या अश्लील व व्यसनाधीन प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी नियमित पोलिस गस्त व कडक कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. रात्री-अपरात्री किल्ल्यावर होणाऱ्या प्रेमीयुगुलांच्या फेऱ्यांवर प्रतिबंध आणण्यासाठी नियमांची कठोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. तसेच, गडकिल्ल्याच्या परिसरात गडाचा ऐतिहासिक वारसा व नियमांचे महत्त्व पटवून देणारे सूचनाफलक लावण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.**

### आंदोलनाचा इशारा

**रत्नदुर्ग किल्ला संवर्धनाबाबत संस्थेचे संस्थापक योगेश सोनवणे यांनी कडक इशारा दिला आहे. ते म्हणाले की, या विषयावर योग्य ती उपाययोजना लवकरात लवकर न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रातून जनआंदोलन उभे केले जाईल. ही बैठक रत्नदुर्ग किल्ल्याच्या पवित्र वास्तूच्या संरक्षणासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरली असून, यासाठी लवकरच अंमलबजावणी होण्याची अपेक्षा आहे.**

निवडक

## भास्कर तरे यांचा सन्मान

**नेरळ :** जाहिरात क्षेत्रात कार्य करणाऱ्या ग्लोकल कम्युनिकेशन या संस्थेचे प्रमुख भास्कर तरे यांचा स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टकडून सन्मान करण्यात आला. कराड येथे राज्यस्तरीय प्राइड ऑफ स्पंदन अवॉर्ड सोहळा आयोजित करण्यात आला होता. स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टकडून आयोजित सोहळ्यात मुंबई येथील ग्लोकल कम्युनिकेशन या संस्थेचा विशेष सत्कार प्राइड ऑफ स्पंदन अवॉर्ड देवून सन्मान करण्यात आला. त्यावेळी डॉ. संदीप डाकवे, डॉ नीलकंठ धारेश्वर, मंगेश चिवटे आदी उपस्थित होते.

## प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**पुणे :** विविध क्षेत्रातील काम करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संयोजक अ‍ॅड. शंकर चव्हाण यांनी दिली आहे. त्यामध्ये सामाजिक, साहित्य, सांस्कृतिक, कला, पत्रकारिता, गायक, युवा, राजकीय, कृषी, उद्योग, आरोग्य, क्रीडा, बँक, कंपनी, आदर्श माता, शिक्षक, कवी, मुख्याध्यापक, प्राचार्य, शाळा, महाविद्यालय, व्यक्ती व संस्थांना महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार २०२५ साठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन केले आहे.

## अशोक म्हात्रे सन्मानित

**चिरनेर :** बेलपाडा येथील अष्टगंध कलामंचाचे अध्यक्ष अशोक कान्हा म्हात्रे यांना सामाजिक क्षेत्रातील द्रोणागिरी भूषण पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. बोकडविरा येथील मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या २४ व्या महोत्सवात माजी आमदार मनोहर भोईर, द्रोणागिरी स्पोर्ट्सचे अध्यक्ष महादेव घरत, अ‍ॅड.रणजीत जाधव, निलेश केळसकर, दीपक शेलार, पिलाजी गोळे, मनोहर गोळे, पुंडलिक म्हात्रे, वैशाली घरत आदी उपस्थित होते.

## गणित दिवस उत्साहात

**माणगाव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात साजरा करण्यात आला भारताचे महान गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त २२ डिसेंबर हा विशेष दिन साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू कर्नल प्रा. डॉ. कारभारी काळे, प्रा.डॉ. आदिती फडके, या उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अरविंद किवळेकर, प्रा. डॉ. संजय नलबलवार, प्रा. डॉ. सचिन पोरे, प्रा.डॉ. अमित शेष आणि प्रा.रवींद्र सोनवणे हे मान्यवर उपस्थित होते.

## फिट इंडिया विकचे उद्घाटन

**रसायनी :** महात्मा एज्युकेशनल सोसायटीचे एचओसी इंटरनॅशनल स्कूल, रसायनी येथील भव्य मैदानावर फिट इंडिया विकचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन आयआरएस असोसिएटच्या रिजनल डायरेक्टर पूर्वा मंदा यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी एच.ओ.सी.एल स्कूलच्या क्रीडा दिवस २०२४-२५ च्या अंतिम दिवशी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा पूर्वा मंदा यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी पूर्वा मंदा यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला.

# नवी मुंबई बनतेय बांगलादेशींचा अड्डा

## वाढत्या गुन्हेगारीमुळे पोलिसांसमोर मोठं आव्हान

। उरण । वार्ताहर ।

**नवी मुंबई शहरात लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना, शहराच्या जवळील गावातदेखील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यात परप्रांतियांचीदेखील भर पडत आहे. त्याचबरोबर अनधिकृतपणे वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. त्यांची कोणतीही कागदपत्रे न तपासता त्यांना गावठाणात थारा दिला जात आहे. त्यामुळे पोलिसांकडून नवी मुंबई, पनवेल आणि उरणमध्ये सातत्याने बांगलादेशी नागरिकांविरोधात होत असलेल्या कारवाईने हे कटूसत्य उघड होऊ लागले आहे.**

२१ व्या शतकातील सुसज्ज शहर म्हणून नवी मुंबईकडे पाहिले जाते. त्यामुळे शहरी भाग, गावठाण भाग, तसेच झोपडपट्टी भागदेखील वाढू लागला आहे. रोजगारासाठी एपीएमसीसारखी मोठी बाजारपेठ या शहरात उपलब्ध होऊ लागली आहे. ठाणे बेलापूरसारखा मोठा औद्योगिक पट्टा असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. या शहरात राहण्यासाठी देशातील विविध नागरिकांची प्रमुख पसंती असल्याने या शहराला प्रति भारत संबोधले जाते. मात्र आता या शहरात बांगलादेशीय वसू लागल्याचे दिसत आहे. त्यांची मोठ्या प्रमाणात घुसखोरी सुरु झाल्याचे पाहायला मिळत आहे. हे बांगलादेशी नागरिक शहरासोबत गावठाण भागाला मुख्य लक्ष करत आहेत. शहरातील सर्वच गाव गावठाणात यांचे वास्तव्य पहायला मिळत आहे. या गावठाण भागात घर मिळवणे सहज सोपे झाले आहे. त्यात स्वस्त भाड्यात घरे मिळत असल्याने यांचा जोर गावातील भागात जास्त असतो. भाड्याने देताना भाड्याच्या पैशांकडे पाहिले जात असल्याने, भाडेकरूची ओळखदेखील तपासली जात नसल्याचे वास्तव समोर येत आहे. त्यांची कोणतीही कागदपत्रे तपासली जात नसल्याचे समोर येत आहेत.

या बांगलादेशी नागरिकांकडे अनधिकृतपणे कागदपत्रे मिळू लागली आहेत, तर अनेकदा बनावट कागदपत्रे बनवून, घर मालकांना दाखवून वास्तव्य केले जात आहे. मात्र पोलिसांच्या कारवाईत सापडल्यावर घर मालकांना आपल्या घरात बांगलादेशी राहत असल्याचे निष्पन्न होत आहे. मात्र तरीही घर भाड्याने देताना अनेकदा मिळणारे भाडे पाहून घरमालक दुर्लक्ष केले जात आहे.या नागरिकांकडे भारतीय पॅन कार्ड, आधार कार्ड, रेशनकार्ड सारखी ओळखपत्रेदेखील मिळत आहेत.

पोलीस तपासात अनेकदा याबाबी समोर आलं आहे. त्यामुळे यावर मुळासकट कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिक करत आहेत. त्यासाठी बनावट कागदपत्रे बनवून देणारी रॅकेट उध्वस्त करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

नवी मुंबई, पनवेलला बारचे शहर म्हणून ओळखले जाते. यात अनधिकृतपणे भारतात येऊन राहिलेल्या बहुतांश बंगलादेशी महिला या वास्तव्य करून वेश्याव्यवसायात उतरल्याचे दिसून येत आहे. अनेक गावांमधून अनेक महिला बारमध्ये जताना दिसतात. शिरवणे गावात तर अशा बार विरोधात आंदोलनेदेखील करण्यात आली असून, बारगर्ल्सना घरे देऊ नका असे आवाहन गावातून करण्यात येत आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत चालू वर्षात आत्तापर्यंत २९ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यात ७२ बांगलादेशी नागरिकांना आरोपी करण्यात आल आहे. अटक नागरिकांना न्यायालयात सादर केले जाते. न्यायालयाने सुनावलेली शिक्षा भोगल्यानंतर त्यांच्या कागदपत्रांची पूर्तता करून त्यांना भारत बांगलादेश सीमेवरील भारतीय सीमा सुरक्षा रक्षक दलाकडे सुपूर्द करण्यात येते. सीमा सुरक्षा रक्षक त्यांच्या मुलुखात रवानगी करतात. चालू वर्षात १४ बांगलादेशी आरोपीची त्यांच्या देशी पुन्हा रवानगी केली असल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आले.

## कोर्लई ख्रिश्चनपाड्यात ख्रिसमसचा धमाका

। रेवदंडा । वार्ताहर ।

जगाला शांतीचा संदेश देणारा नाताळ सणाला येत्या २५ डिसेंबरला सुरूवात होत असून मुरूड तालुक्यातील कोर्लई येथील माउंट कार्मेल चर्च व ख्रिश्चनपाड्यात सलग सात दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. एकूणच कोर्लईमध्ये ख्रिसमस सण मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येत आहे.

२५ डिसेंबर रोजी नाताळ सणास प्रारंभ होत असून ख्रिश्चन बांधव व भगिनी यांनी कोर्लई माउंट कार्मेल चर्च मध्ये येशूच्या जन्मोत्सवाची प्रार्थनेचे आयोजन केले असून सणाला उत्साहात दुपारी कोर्लई चर्चच्या आवारात ख्रिश्चन बांधव व भगिनीसाठी विविध खेळाचे आयोजन करण्यात आले आहे. गोशाळा म्हणून प्रसिध्दीस असलेले कार्यक्रमात



येशूच्या जन्माचा देखावा स्पर्धा कोर्लई गावात घेण्यात येणार आहे. येशूच्या जन्माच्या वेळेला आकाशात तारखा दिसू लागल्या, अश्याच तारखा स्पर्धा घेण्यात येणार आहे.युवकांसाठी संमेलन आयोजीत करण्यात आले आहे. कोर्लई ख्रिश्चन पाड्यात खेळाचे आयोजन तसेच गतवर्षीच्या २०२४ बद्दल देवाला धन्यवाद प्रार्थनेचे आयोजन करण्यात येणार आहे.

## वावडुंगी-शिघ्रे येथे बांधला वनराई बंधारा

। कोर्लई । वार्ताहर ।

कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालय वाणदे येथे आयोजित सात दिवसीय विशेष श्रम संस्कार शिबिरामध्ये वावडुंगी-शिघ्रे येथे विद्यार्थ्यांनी वनराई बंधारा बांधल्याने ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

मुरुड तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ, कृषी सहायक एम.जी. कदम, ए.जी. उपाध्ये, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, शेतकरी प्रमोद मसाल, महाविद्यालय विकास समिती, प्राचार्य डॉ. जे.के.कांबळे, प्रा. डॉ. एस. एस. बहिरगुंडे, प्रा.डॉ.



जी.डी.मुनेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत पाणी अडवा पाणी जिरवा या संकल्पनेतून वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे वावडुंगी-शिघ्रे येथे विद्यार्थ्यांनी बांधण्यात आलेल्या वनराई बंधाऱ्यामुळे पशु-पक्षी व गुरेढोरे तसेच नदीकाठच्या रब्बी हंगामातील भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना, ग्रामस्थांना पाणीसाठा उपलब्ध झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.

## जागतिक ध्यान दिन

। रसायनी । वार्ताहर ।

जागतिक ध्यान दिनानिमित्त, पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सने हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ज्याचा उद्देश हृदयस्थ ध्यान आणि आंतरिक शांतीच्या सरावाला चालना देण्याच्या उद्देशाने होता.

पिल्लई ग्रुप इन्स्टिट्यूशन्सचे सीईओ म्हणाले कि,व 'यक्तिक वाढीसाठी आणि आंतरिक शांततेसाठी मी ध्यानाच्या महत्त्वावर नेहमीच भर दिला आहे. मनाच्या शांततेतूनच आपण जागृत होतो. खरी क्षमता, मानसिक स्पष्टता मिळवा आणि चिरस्थायी मनः शांती आणणारी सुसंवाद जोपासा. ध्यानाचा हा उत्सव हार्टफुलनेस मेडिटेशनसारख्या पद्धती जीवनात अधिक शांतता, फोकस आणि समतोल कशी आणू शकतात याची एक वेळोवेळी आठवण करून देणारी होती,जे तरुणांसाठी मौल्यवान आहे.'



## 'धरणाचा शेतीसाठी उपयोग करावा'

। तळा । वार्ताहर ।

तळा तालुक्यातील वावे, वांजळोशी धरणाचा शेतकऱ्यांनी शेतीसाठी उपयोग करावा असे आवाहन आमदार तुकाराम काते यांनी तळा तालुक्यातील शेतकरी वर्गाला केले.


तुकाराम काते आमदार झाल्यानंतर त्यांच्या तळा तालुक्यातील बोरीचामाळ येथील निवासस्थानी आले असता, त्यांचा संघटनेकडून सत्कार करण्यात आला. यावेळेस शेतकरी संघटनेचे सचिव कैलास पायगुडे, खेळू वाजे, गोविद कीर्तने, नामदेव साळवी, महादेव आर्डे उपस्थित होते. यावेळी आ.तुकाराम काते यांनी शेती हा माझा जिव्हाळ्याचा विषय असून, तालुक्यातील वावे, वांजळोशी



धरणाचा शेतकऱ्यांनी शेतीसाठी उपयोग करावा. आधुनिक शेती करून लघुद्योग सुरू केल्यास येथे रोजगारासाठीदेखील संधी उपलब्ध होऊ शकते, असे सांगून यासाठी शेतकरी संघटनेने पुढाकार घ्यावा मी तुमच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही दिली.

आ. काते यांनी शेतकऱ्यांसाठी स्थापन झालेल्या शेतकरी संघटनेचे अभिनंदन केले. तालुक्यातील शेती, शेती पूरक व्यवसाय, लघुद्योगासाठी आ. काते स्वतः लक्ष देणार असल्याने शेतकरी संघटनेने समाधान व्यक्त करून आ. तुकाराम काते यांचे आभार मानले.

## नेरळ स्थानकातील पादचारी पूल उद्घाटनाच्या प्रतिक्षेत



। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ रेल्वे स्थानकातील फलाट एक वर बांधण्यात आलेल्या पादचारी पूल आता वापरासाठी तयार आहे. फलाट एक वरील तोडण्यात आलेल्या ब्रिटिशकालीन पादचारी पुलाच्या जागी हा नवीन पादचारी पूल बनविला जात आहे.या पुलाचे उद्घाटन कधी होणार आणि पुलावरून वाहतूक कधी सुरु होणार? याबाबत प्रवासी विचारणा करीत आहेत. मध्य रेल्वे मेन लाईन वरील मुंबई पुणे मार्गावरील नेरळ जंक्शन स्थानकात प्रवासी यांची संख्या लक्षात घेऊन पादचारी पुलांची संख्या वाढवण्यात येत आहे. आता पर्यंत नेरळ स्थानकातील फलाट एक वर दोन पादचारी पूल असून आणखी दोन पादचारी पूल निर्माण केले जात आहेत. त्यातील स्थानकाच्या मध्यमभागीं असलेल्या पादचारी पुलाचे काम पूर्ण झाले आहे.या पुलाचे बहुतेक काम पूर्ण झाले असून जानेवारी महिन्यात हा पूल प्रवाशांसाठी खुला होणार आहे.

## निजामपूरमध्ये महिलांचा निषेध मोर्चा

। माणगांव । वार्ताहर ।

माणगांव तालुक्यातील निजामपूर शहरात ८० वर्षीय वृद्ध महिलेवर सुमारे १८ वर्षाच्या तरुणाने अत्याचार केला. याप्रकरणी २० डिसेंबर रोजी माणगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला त्यानंतर माणगांव तालुक्यात या घटनेच्या विरोधात निषेधार्थ पडसाद उमटत आहेत. असाच निषेध मोर्चा निजामपूर शहरातकाढण्यात आला.

या मोर्चामध्ये निजामपूरमधील महिला भगिनी व त्यांच्या साथीला विविध सामाजिक संघटना आणि समस्त निजामपूर ग्रामस्थ उपस्थित होते. या मोर्चात आरोपीला फाशी द्या, कडक कारवाई करा अशा मागणीच्या घोषणा देण्यात आल्या. तसेच आजीला न्याय द्या आरोपीला कठोर शिक्षा करा असा घोषणा देण्यात आल्या. हा मोर्चा पीडित महिला यांच्या घरापासून काढण्यात आला. यावेळी निजामपूर येथील प्रकरणी प्रशासनाने संबंधित आरोपी विरोधात योग्य ती दखल न घेतल्यास ह्या आंदोलनाचे उग्र स्वरूप माणगाव तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्यात दिसून येईल असे मत या मोर्चा आंदोलनात सहभागी झालेल्या निजामपूरवासीयांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले आहे.




# नाताळनिमित्त बाजारपेठा सजल्या

## चिमुकल्यांसाठी विविध केकसह गिफ्ट हॅम्पर उपलब्ध

। रायगड । प्रतिनिधी ।

नाताळ अवघ्या काही दिवसांवर आला आहे. त्यामुळे बाजारपेठा सजल्या आहेत. बाजारात सांताक्लॉजचा ड्रेस व टोप्या मोठ्या प्रमाणात विक्रीस आहेत.

शिवाय, ख्रिसमस ट्री, विविध प्रकारचे केक, रंगीबेरंगी फुगे, रिबिन्स, विद्युत रोषणाईच्या माळांची बच्चे कंपनीमध्ये क्रेझ आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणच्या चर्चमध्ये सजावट, आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. नाताळ गोठा सजवण्यात येत आहे. याशिवाय हॉटेल, मॉल, इलेक्ट्रॉनिक्स दुकाने व केकच्या दुकानात ख्रिसमससाठी आकर्षक सजावट केल्याचे दिसते. काही दुकानदारांनी सवलतीही जाहीर केल्या आहेत. शाळांमध्ये



सांताक्लॉजचे स्वागत करण्यात येत असून सिक्रेट सांताच्या गिफ्टची मजा बच्चे कंपनी घेत आहेत.

पारंपरिक वेशभूषा, खाद्यपदार्थ आणि संस्कृती जोपासत असलेल्या ख्रिस्तीधर्मीयांची संख्या ठाण्यात मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे ठाण्यात येशू जन्मोत्सवाची आस लागली आहे. नाताळ सण खरेदीसाठी बाजारात लगबग सुरू आहे. नाताळनिमित्त घर, चर्च, कार्यालय व गृहसंकुले सजविण्यासाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी ग्राहक गर्दी करीत आहेत. पारंपरिक पद्धतीने बनवलेले केक, विविध खाद्यपदार्थ, मित्रमैत्रिणी, नातेवाइकांना देण्यासाठी दुकानांत भेटवस्तू पाहावयास मिळत आहेत.

चांदण्यांसह विविध वस्तू वापरून घराघरात आणि चर्चमध्ये आकर्षक सजावटीने सुंदर वातावरण पसरलेआहे. सांताक्लॉजचेप्रतिकृती, मोजे, मुखवटे, टोप्या, ख्रिसमस ट्री, कॅण्डल स्टॅण्ड, चॉकलेट्सचे हॅम्पर बास्केट, आकर्षक पद्धतीने तयार केलेली भेटकार्डे, चांदण्या, चेरी, रीथ, चिनी बनावटीच्या पानाफुलांच्या वेली, झाडे, फळे उपलब्ध आहेत.या वस्तूंची विक्री १५० रुपये ते ४०० रुपयांपर्यंत करण्यात येत आहेत. मिठाईच्या दुकानांमध्ये खास नाताळनिमित्त मिठाई उपलब्ध आहे. तसेच, बिस्कीटचे प्रकारही उपलब्ध आहेत.

## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, ब्रेकफास्ट हेल्पर, हाऊस कीपर १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- अलिबाग-रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत. Reception-House Keeping-Waiter-Helper-Cook- etc. Phone: ९३२३१५२९९०.
- अलिबागमधील ब्युटी पार्लर कामासाठी अनुभवी मुलगी पाहीजेत. ८१४९८६५६२५
- अलिबाग आणि परिसरातील Bsc, Bcom, BA पदवीधर उमेदवारांना Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी. त्वरित संपर्क करा. ९४०३२१२१२१
- अलिबाग येथे मोक्याच्या ठिकाणी EDII नॅशनल इन्स्टिट्यूट कार्यालयाकरीता जागा भाड्याने पाहिजे. संपर्क : शशिकांत दनोरीकर ७७७५८०२४९७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## आगरी कोळी समाजातील महिला उतरल्या रस्त्यावर

# साडी आहेराच्या प्रथेविरुद्ध एल्गार

। उरण । वार्ताहर ।

**लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा आणि तितकाच आनंदाचा क्षण असतो. हा क्षण नवरा-नवरीप्रमाणे त्यांच्या कुटुंबियांसाठीदेखील तितकाच आनंद अन् उत्साहाचा असतो.**

त्यामुळे एकदा का लग्नाची तारीख ठरली की, साखरपुडा पार पडल्यानंतर लग्नघरात सजावट, जेवण कसे असेल इथपासून ते नवरी-नवरीचे दागिने, कपड्यांपर्यंत सर्वांविषयी चर्चा सुरू होते. पण, लग्नात नवरा-नवरीच्या कपड्यांपेक्षा मानपानाच्या साड्यांचा विषय हा खूप मोठा असतो, विशेषत: आगरी-कोळी समाजात फक्त लग्नच नाही, तर प्रत्येक शुभ कार्यात महिलांना साडी देण्याची परंपरा आहे, जी मोठी खर्चिक परंपरा आहे. त्यामुळे लग्नापेक्षा यासाठी सर्वाधिक पैसा खर्च होतो जो प्रत्येकालाच परवडण्यासारखा नसतो. त्यामुळे ही परंपरा बंद करण्यासाठी उरणमधील कोपर गावातील महिलांनी अनोखे आंदोलन केले आहे. या आंदोलनाचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.व्हिडीओमध्ये आगरी कोळी समाजाच्या काही महिला हातात बॅनर घेऊन रस्त्यावर उतरून, बंद करा, बंद करा साड्यांचा आहेर बंद करा अशी घोषणा देत प्रत्येक कार्यक्रमात साडी देण्याच्या परंपरेला विरोध दर्शवीत आहेत. दरम्यान, व्हिडीओच्या कमेंट बॉक्समध्येही अनेकांनी या आंदोलनास समर्थन दिले आहे.

लग्नसमारंभासह प्रत्येक कार्यक्रमात साड्या देण्याच्या प्रथेविरोधात आगरी व कोळी समाजातील शेकडो महिला हातात बॅनर्स घेऊन गावात प्रत्येक कार्यक्रमात साड्या देण्याच्या प्रथा परंपरेला तीव्र विरोध करीत आहेत. यावेळी काही महिलांच्या हातात बॅनरदेखील दिसत आहेत ज्यावर बंद करा, बंद करा, साड्यांचा आहेर बंद करा असे लिहिले आहे.

आंदोलनातील महिलादेखील तीच घोषणाबाजी करत आहेत. या कोपर गावातील महिलांनी आता एकमताने लग्न, पूजा, ओटभरणी अशा कार्यक्रमांना साड्या घ्यायच्या नाहीत, असा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे अनेकांनी स्वागतच केले आहे आणि अनेकांनी साड्यांप्रमाणे सोने, मेकअपवर यावरही बंदी आणली पाहिजे, अशी मिश्कील टिप्पणी केली आहे.

एकूणच आगरी व कोळी समाजात प्रत्येक कार्यक्रमात मानपानाच्या साड्यांसाठी भरमसाट खर्च होतो, जो अनेक कुटुंबांना न परवडणारा असतो. त्यामुळे ही साडी देण्याची प्रथाच बंद व्हावी यासाठी महिलांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले आहे.

## रामबाग उद्यानाचा वर्धापनदिन

**उरण :** महाराष्ट्राच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या आणि लाखो निसर्गप्रेमींनी भेट दिलेल्या पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथील मरामबागफ या अतिसुंदर उद्यानाचा द्वितीय वर्धापन दिन सोहळा हजारो नागरिकांच्या साक्षीने मोठ्या उत्साहात रविवारी सायंकाळी साजरा झाला. नयनरम्य वातावरण, आकर्षक विद्युत रोषणाई, उत्तम नियोजन आणि लहानग्यांपासून युवक, महिला, ज्येष्ठांची उपस्थितीने रामबाग नंदनवन प्रमाणे फुलले होते. आणि त्यातच पारंपरिक आगरी-कोळीगीतांच्या बहारदार कार्यक्रमाने वातावरणात स्फूर्ती आणली होती. यावेळी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

# पेण येथे महिलांकरिता उद्योजिका विकास प्रशिक्षण

**। पेण । प्रतिनिधी ।**

भारतीय उद्योजिका विकास संस्था अहमदाबाद व टाटा कम्युनिकेशन्स मुंबई द्वारा आयोजित पेण येथे अनुसूचित जाती अनुसूचित जमाती तसेच दिव्यांग व्यतीकरिता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन पेण येथे करण्यात येत आहे.

टाटा कम्युनिकेशन्सच्या सामाजिक दायित्व विभाग अंतर्गत प्रकल्प उद्या द्वारे पेण तालुक्यातील अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील महिला तसेच दिव्यांग महिला व पुरुष यांचे करीता तीन आठवडे कालावधीचे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करण्यात येत आहे. या प्रशिक्षणामध्ये उद्योजकीय व्यक्तिमहत्व विकास, संभाषण कौशल्य, ग्राहक संबंध, उद्योग संधी, उद्योगाची निवड, मार्केट सर्वे, क्षेत्र भेट, व्यवसायाची हिशोब पद्धती, सिद्धी प्रेरणा, विपनन व्यवसायाचे, व्यवस्थापन प्रकल्प, अहवाल तयार करणे, यशस्वी उद्योजकांसोबत संवाद व चर्च्या इत्यादी विषयाचे मार्गदर्शन तज्ञ साधन व्यक्ती द्वारे करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम निशुल्क स्वरूपाचा असून प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्याकरिता पात्रता अशी की वय १८ वर्षे पूर्ण ते ४५ पर्यंत शिक्षण कमीत कमी ७ वी उत्तीर्ण ते पुढे असा असून अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला आधार कार्ड पॅन कार्ड रेशन कार्ड फोटो १ दिव्यांग व्यक्तींकरिता दिव्यांग प्रमाणपत्र इ. झेरॉक्स कॉपीज जोडाव्यात प्रशिक्षणामधून जास्तीत जास्त महिला व दिव्यांग व्यक्तींनी स्वयंरोजगार निर्माण करून आत्मनिर्भर व्हावे हा उद्देश आहे प्रशिक्षणाच्या इतर माहिती व प्रवेश अर्जाकरिता शशिकांत दनोरीकर प्रकल्प अधीकारी भारतीय उद्योजकता विकास संस्था ई डी आय अलिबाग जि. रायगड मो. क्र . ७७७५८०२४९७ यांचेशी सपर्क साधावा असे आवाहन ई डी आय व टाटा कम्युनिकेशन्स द्वारा आवाहन करण्यात येत आहे.




# आगरी बोली संवर्धन पुरस्कार रायगड भूषण प्रा. एल.बी. पाटील यांना प्रदान

**। उरण । वार्ताहर ।**

सातारा येथे २१/२२ डिसेंबर रोजी झालेल्या सर्जनशील शब्दवेल साहित्य संमेलनात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य पुष्पकांत गावंडे यांच्या शुभहस्ते उरणचे सुपुत्र, ज्येष्ठ साहित्यिक एल. बी. पाटील यांना आगरी बोली संवर्धन शब्दवेल पुरस्कार हा प्रदान करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर यांनी शब्दवेलच्या चौथ्या साहित्य संमेलनात हा पुरस्कार आगरी बोलीतील ज्येष्ठ साहित्यिक आणि ज्यांनी आगरी बोलीसह मराठी साहित्याची मोठी सेवा सेवा करित असलेल्या व्यक्तिमत्वाला दिला जात असल्याने आनंद झाल्याचे मत व्यक्त केले.

ज्येष्ठ साहित्यिक एल. बी. पाटील यांनी आगरी बोलीतील चार नाटके, दोन कविता संग्रह यासह मराठी साहित्यात ३५ पुस्तकांचे प्रकाशन केले आहे.

एल. बी. पाटील हे महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य असून कोकण मराठी साहित्य परिषदेचे (कोमसापचे) ते जनसंपर्क प्रमुख आहेत. एल बी पाटील हे कोकणात साहित्य चळवळीत ४० वर्षे कार्यरत असलेले व्यक्तिमत्व आहे.

त्यांच्या व्यक्तिमत्वाला साजेसा असा हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल ज्येष्ठ साहित्यिक एल.बी. पाटील यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## महाराष्ट्र शासन
## महाड मार्ग प्रकल्प विभाग, महाड (रायगड)

Email :-rpddivision@gmail.com Ph.No. (02145) 222243

**निविदा सुचना क्रमांक १५ सन २०२४-२५ (द्वितीय सुचना)**

कार्यकारी अभियंता, महाड (मा.प्र.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२ ३०१, दुरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (मा.प्र.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/बयाना रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पुर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | रायगड किल्ल्यावर खुबलढा बुरुज ते नाणे दरवाजा पदपथाचे बांधकाम करणे, ता. महाड, जि.रायगड. | १,७२,२७,१९३.०० | १,५०,०००.०० | १९८०/- | १२ महिने | खुला |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ३१/१२/२०२४ (सकाळी १०.०० पासुन) ते दिनांक १४/०१/२०२५ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदा पुर्व बैठक | अधीक्षक अभियंता, रायगड (सा. बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ०७/०१/२०२५ वेळ ११.०० वाजता. |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड (सा. बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक १६/०९/२०२५ वेळ ११.०० वाजता. |

**टिप:-** परिपुर्ण निविदा या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा क्र. मवि/लेशा/निविदा/७२४
दिनांक : २०.१२.२०२४

सही/-
**(श्रीम.सलोनी स.निकम)**
कार्यकारी अभियंता
महाड (मा.प्र.) विभाग, महाड,

दिनांक : २४ डिसेंबर २०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे शिंगढोल, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| संदीप गोमा पाटील<br>रीना संदीप पाटील | ५८ | ४ | १-११-०० | ० | ९७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- २४/१२/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

## जाहीर नोटीस

दिनांक : २३ डिसेंबर २०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे उंबरविरा, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मीटर | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| गोविंद चंदर पाटील वगैरे ५ | १ | ९अ | ००-४८-०० | ०३ | ६० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

सही / -
**ॲड.अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :-२३/१२/२०२४
मो.नं.९९२२३६८१२१

# सुमन केदारी यांचे निधन

**। उरण । वार्ताहर ।**



उरण तालुक्यातील पाणदिवे येथील रहिवाशी सुमन शिवाजी केदारी (वय ६५) यांचा गुरूवारी (दि. १२) अल्पशा आजाराने निधन झाले आहे. सुमन केदारी यांचा दशक्रिया विधी शनिवारी (दि.२१) श्री माणकेश्वर- उरण येथे संपन्न झाला. त्यांचे उत्तरकार्य (दि.२४)त्यांच्या राहत्या घरी पाणदिवे येथे संपन्न होणार आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर सूचना

याची नोंद घ्यावी की, आमच्या अशिलांच्या वतीने, आम्ही **(१) आर. कृष्णमुर्ती (उर्फ कृष्णमुर्ती रमणकुट्टी)** आणि **(२) जॅसिंटा कृष्णमुर्ती (उर्फ जॅसिंटा मारिया कृष्णमुर्ती)** यांच्या यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या मौजे- कावीर, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील सर्व म्हणजेच (१) गट क्र. ७४, क्षेत्रफळ ००-८६-८० (एच-आर-पी), (२) गट क्र. ७५, क्षेत्रफळ ००-२८-८० (एच-आर-पी) आणि (३) गट क्र. ९७, क्षेत्रफळ ०५-९०-२० (एच-आर-पी) च्या जमिनीच्या (यात यानंतर '**सदर जमीन**' म्हणून संदर्भित) संबंधातील हक्कविलेखांची चौकशी करीत आहोत.

सदर मालमत्तेच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, अभिहस्तांकन, गहाण, आकार, बक्षीस, न्यास, एकाधिकार, वारसा, भोगवटा, कब्जा, भाडेदारी, पोट- भाडेदारी, संमती नि परवानगी, अनुज्ञप्ती, काळजीवाहू तत्वावरील, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, धारणाधिकार, परिरक्षा, सुविधाधिकार, प्रसंविदा, अधित्याग, अधित्यजन, अनुदान किंवा कोणत्याही पद्धतीने कोणताही करार, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांतरण विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, सामंजस्य ज्ञापन, विवाद, कोणत्याही न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश, करार/करारनामे किंवा भार किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा मागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निम्नस्वाक्षरीकर्त्यांना अशा दाव्याच्या या सूचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून **२१ (एकवीस) दिवसांच्या** आत पाठींबा देणाऱ्या सर्व नोटरी केलेल्या दस्तऐवजासह लेखी स्वरुपात ज्ञात होण्यासाठी कळवावे अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. अन्यथा अशा व्यक्तींचा दावा, मागणी, अधिकार, हक्क, हितसंबंध, विवाद किंवा आक्षेप, जर काही असेल तर, त्यांचा अधित्याग/परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि अशा प्रकारचे दावे आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**परिशिष्ट :**
**(सदर जमिनीचे वर्णन)**

मौजे-कावीर, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, येथील खालील दिलेल्या वर्णनाच्या शेतकी जमीन, दायाप्ती किंवा मैदानाचा तो सर्व तुकडा आणि भाग :

१. आर. कृष्णमुर्ती यांच्या नावातील गट क्र. ७४, क्षेत्रफळ ००-७४-६० (एच-आर-पी) आणि पोट खराब ००-१२-२०(एच-आर-पी), एकूण क्षेत्रफळ ००-८६-८० (एच-आर-पी), जी १६ रुपये- ८८ पैसे प्रमाणे निर्धारित केलेली आहे आणि खालील प्रमाणे सीमित असलेली :
पूर्व दिशेकडे : मौजे कावीरचा गट क्र. १४३
पश्चिम दिशेकडे : मौजे कावीरचा गट क्र. १४३ आणि ९७
उत्तर दिशेकडे : मौजे कावीरचा गट क्र. १४३
दक्षिण दिशेकडे : मौजे कावीरचा गट क्र. ७५

२. आर. कृष्णमुर्ती यांच्या नावातील गट क्र. ७५, क्षेत्रफळ ००-२५-८० (एच-आर-पी) आणि पोट खराब ००-०३-००(एच-आर-पी), एकूण क्षेत्रफळ ००-२८-८० (एच-आर-पी), जी ५ रुपये- ८१ पैसे प्रमाणे निर्धारित केलेली आहे आणि खालील प्रमाणे सीमित असलेली :
पूर्व दिशेकडे : मौजे कावीरचा गट क्र. १४३
पश्चिम दिशेकडे : मौजे कावीरचा गट क्र. ९७
उत्तर दिशेकडे : मौजे कावीरचा गट क्र. ७४
दक्षिण दिशेकडे : मौजे कावीरचा गट क्र. ९७ आणि १४३

३. आर. कृष्णमुर्ती आणि जॅसिंटा कृष्णमुर्ती यांच्या नावातील गट क्र. ९७, क्षेत्रफळ ०५-३९ - ९० (एच-आर-पी) आणि पोट खराब ००-५०-३०(एच-आर-पी), एकूण क्षेत्रफळ ०५-९०-२० (एच-आर-पी), जी ५५ रुपये- २४ पैसे प्रमाणे निर्धारित केलेली आहे आणि खालील प्रमाणे सीमित असलेली :
पूर्व दिशेकडे : मौजे कावीरचा गट क्र. ७४, ७५, १४३, ७९, ८०, ८१, ८४ व ८६
पश्चिम दिशेकडे : मौजे कावीरचा गट क्र. १४३, ९५, ९६, ९१, ९४, ९३ आणि ९२
उत्तर दिशेकडे : मौजे कावीरचा गट क्र. ७८, ७७, ७६, ७४, ७५ आणि १४३
दक्षिण दिशेकडे : मौजे कावीरचा गट क्र. १४३, ९६, ९५, ९१, ९४, ९३, ९२, ८६, ८४, ८०

**आज दिनांक २४ डिसेंबर, २०२४**

**नेहा सेहगल**
**भागिदार**
**युनिव्हर्सल लिगल**
१६१/१६२, ए विंग, मित्तल कोर्ट, जमनालाल बजाज मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१

## रिसॉर्ट भाड्याने देणे आहे.
**६ A/C ROOMS, किचन हॉल स्विमिंगपुल नारळाची वाडी पार्किंगसह (एकूण क्षेत्र १० गुंठे)**
**संपर्कः- ८३२९१७५७९१ ठिकाण आक्षी (रायवाडी)**

## जाहीर समन्स

प्रोसेस जमा रू.
वादी तर्फे वकील श्री. अमित. एम. देशमुख
रे. मु. नं. ९२/२०२०

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

श्री. मुकुंद दामोदर उर्फ दत्तात्रेय म्हात्रे वगैरे — वादी
विरूध्द
श्री. केशव विठोबा ठाकूर वगैरे — प्रतिवादी

या जाहिर समन्सद्वारे प्रतिवादी नं. १३ EDEL Land Limited तर्फे व्यवस्थापक /कार्यकारी संचालक, पत्ता-१४ वा मजला, एक्सप्रेस टॉवर, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०००२१ व प्रतिवादी नं. १६ श्री. जगदिश पांडुरंग कोळी, पत्ता मु. पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड व सध्या रा. बोरीवली, मुंबई यांस कळवण्यात येते की, वादी यांनी प्र.वादी यांचे विरूद्ध दावा ठरावासाठी, वाटपासाठी, निरंतरचे मनाईसाठी अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो यांचे न्यायालयात रेग्युलर मुकदमा क्र. ९२/२०२० दाखल केला असुन सदर दावा मौजे झिराड येथील गट नं. ७२, ७३, ७४/१, ७४/२, ५९, ६० आणि ६३९ या मिळकती हिंदू एकत्र कुटुंबाच्या असल्याचे जाहिर करून वादींचा दावा मिळकतीमध्ये एकत्रित रित्या १/७ इतका अथवा कायदेशीर अविभक्त हिस्सा असल्याचे जाहिर होणे व इतर अनुषंगिक मागण्यासाठी केला आहे. प्रतिवादी क्र. १३ व १६ यांस काढलेल्या समन्सची बजावणी होत नसल्याचे आढळुन आले आहे. प्रतिवादी नं. १३ व १६ यांचा उपरोक्त पत्ता हा योग्य व बरोबर असुनही प्रतिवादी नं. १३ EDEL Land Limited व १६ श्री. जगदिश पांडुरंग कोळी यांचेवर समन्सची बजावणी होत नाही. प्रतिवादी नं. १३ EDEL Land Limited व १६ श्री. जगदिश पांडुरंग कोळी हे स्वत:वर समन्सची बजावणी होऊ देत नसल्याची खात्री वादी यांची झाल्याने प्रतिवादी नं. १३ EDEL Land Limited व १६ श्री. जगदिश पांडुरंग कोळी यांचे विरूद्ध जाहिर समन्स द्वारे समन्सची बजावणी व्हावी यासाठी वादीने मा. न्यायालयात अर्ज दिला होता व तो मा.न्यायालयाने मंजुर केला आहे.

सबब, उपरोक्त प्रतिवादी नं. १३ EDEL Land Limited व १६ श्री. जगदिश पांडुरंग कोळी यांस या जाहिर समन्सद्वारे कळविण्यात येते की, दि. १८/१/२०२५ रोजी आपण स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी किंवा वकील यांचेमार्फत मा.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो, अलिबाग यांचे न्यायालयात सकाळी ठीक १०.३० वाजता हजर राहावे व आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा प्रतिवादी नं. १३ EDEL Land Limited व १६ श्री. जगदिश पांडुरंग कोळी यांस सदरहु दाव्याचे कामी काहीएक सांगावयाचे नाही असे समजुन दाव्याची सुनावणी एकतर्फी घेऊन निर्णय दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दि.माहे डिसेंबर २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**अधिक्षक** — **लिपीक**
सही/-
**दिवाणी न्याया. कनिष्ठ स्तर अलिबाग** — **दिवाणी न्याया. कनिष्ठ स्तर अलिबाग**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मौजे कावाडे ता. अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. शितल सूर्यकांत पाटील आणि श्री सुर्यकांत सदानंद पाटील राहणार कावाडे पो. रेवस ता. अलिबाग जिल्हा रायगड यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. त्याअनुषंगाने आमचे अशिल व सौ. शितल सुर्यकांत पाटील आणि श्री सुर्यकांत सदानंद पाटील यांच्यात दिनांक ०९/०१/२०२४ रोजी विसार पावती झालेली होती. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याची खातरजमा करण्याकरिता आमचे अशिलानी दैनिक सागर या वृत्तपत्रात दिनांक १६/०१/२०२४ रोजी जाहिर नोटिस प्रसिद्ध केलेली होती. व सदर नोटिशीस आजतागायतपणे कोणाचीही कसल्याही प्रकारे हरकत उपस्थितीत झालेली नाही. सदरच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| कावाडे | ५ | ०.१२.८०<br>पो.ख.०.०१.२०<br>एकूण ०.१४.०० | ३.५४ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात आमचे अशिल व सौ. शितल सुर्यकांत पाटील आणि श्री सुर्यकांत सदानंद पाटील यांच्यात विक्री व्यवहार झालेल्या असल्याकारणांने सदर मिळकतीसंदर्भात अन्य कोणीही कसल्याही प्रकारे व्यवहार करू नये व त्यास आमची सक्त हरकत असणार आहे यांची नोंद तमाम जनतेने घ्यावी.
कळावे.

अलिबाग,
दिनांक : /१२/२०२४

सही /
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय, रायगड
पत्ता गुरूदत्त सोसायटी,
कन्याशाळेच्या बाजूला.
गाळा नं. २ ता. अलिबाग
जि. रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रसाद दत्ताराम पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| झिराड | ४४३ | ०-११-१०<br>पो. ख. ०-०२-००<br>०-१३-१० | ०.२० |

पैकी श्री. प्रसाद दत्ताराम पाटील यांचे मालकीची ० हेक्टर १ आर एवढी मिळकत.

गट नं. ४४३ पैकी ० हे. १ आर मिळकत श्री. प्रसाद दत्ताराम पाटील यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : २४/१२/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग', को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी
अलिबाग, रायगड- ४०२ २०१


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे महाळूंगे बुद्रुक, ता. मुरुड, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक ७/१/क एकुण क्षेत्र ००-१२-०० हे. आर, आकार ०० रुपये १२ पैसे ही मिळकत मिळकतीचे विद्यमान कबजेदार श्री अरुण गोपाळ बना व श्री विजय गोपाळ बना यांचे खुद्द मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची आहे. सदरची मिळकत माझे आशिलांनी मिळकतीचे सदर विद्यमान कबजेदार यांजकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा करार माझे अशिल व मिळकतीचे विद्यमान कबजेदार यांच्यात झालेला आहे. सदर मिळकतीची मालकी व ताबा कबजा विद्यमान कबजेदार यांचाच आहे असा भरवसा त्यांनी माझे अशिलांस दिलेला आहे. तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्न वस्त्राचा बोजा, वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार 'खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट' यांजकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा कबजा वरील विद्यमान कबजेदार श्री अरुण गोपाळ बना व श्री विजय गोपाळ बना यांचाच आहे असे समजुन माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. २३/१२/२०२४

सही/-
**ॲड. श्रद्धा प्रदिप वैद्य**
'नागेश्वरभुवन', गणपती आळी,
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

जावक क्रमांक /नोंदणी/२९४९/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड विभाग, कल्पतरु इमारत, मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, रायगड, रायगड, रायगड,
दि. २३/१२/२४ रायगड

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमाांक: RGD / 35036/18/24
फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक. ४८१/२४
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक अदिति चॅरिटेबल ट्रस्ट बाबत
न्यासाचा पत्ता :- गणपती वाडी अंबेघर, पेण खोपोली रोड, गणपती वाडी अंबेघर, रायगड, पेण, आंबेघर
अर्जदार अमोद रामचंद्र मुंढे,
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Trust Deed Amount | १०००.०० |

(अ) जंगम मिळकतः रोख रु. १०००/- मात्र (अक्षरी रुपये एक हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकत रोख रु. /- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २३-१२-२०२४ रोजी दिली

सही/-
**अधिक्षक (प्र)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय रायगड**

OW NO.नोंदणी २९४८/२०२४
Public Trusts Registration Office, Raigad
Address: Public Trust Registration Office, Raigad, Kalpataru Building. Near Main Post Office, Alibaug, Raigad, Raigarh, Raigarh, Raigarh
Dt : 03/12/24

## Public Notice

**Service Request Number: RGD/14769/18/24**
**Inquiry/case No.: 484/24**
**Name of the Trust**: KALBHOR CHARITABLE TRUST
**Address of the Trust: House No.128, Chikhale,, Taluka Panvel, Dist. Raigarh Raigarh, Raigarh, Raigarh**
**Registration Number of the Trust (if):** KALBHOR CHARITABLE TRUST
**Name of the Applicant :** MR.SANTOSH GAJANAN KALBHOR
**To**
**All Concerned having interest**

Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Greater Mumbai Region. 1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash in Hand | 1000.00 |

**Value of Movable Property**: Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Na | 00 | 00 | 00 | 00 | 0.00 |

**Value of Immovable Property**: Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.
This notice given under my hand and seal of the Office on this date 23/12/2024.

Sd/-
**(I/c Superintendent )**
**Public Trusts registration Office, Raigad**

निवडक

## किशनचे खणखणीत शतक

**नवी दिल्ली :** विजय हजारे ट्रॉफी २०२४-२५ ही देशांतर्गत एकदिवसीय स्पर्धा पुढीलवर्षी होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या आधी होत असल्याने महत्त्वाची मानली जात आहे. या स्पर्धेतील खेळाडू आपली प्रतिभा सिद्ध करताना दिसत आहेत. नुकतेच इशान किशन हा देखील पुन्हा भारतीय संघाचे दार ठोठावताना दिसत आहे. तो या स्पर्धेत झारखंड संघाचे नेतृत्व करत आहे. त्याने या स्पर्धेत दुसऱ्या फेरीत खणखणीत शतक ठोकले असून संघाला सलग दुसरा विजय मिळवून दिला आहे.

## बंगालने इतिहास रचला

**राजकोट :** भारतात सध्या वरिष्ठ महिला एकदिवसीय चषक ही देशांतर्गत क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत राजकोटमध्ये बंगाल आणि हरियाणा या महिला संघात सोमवारी उपांत्यपूर्व सामना झाला. या सामन्यात बंगाल संघाने इतिहास रचला आहे. हरियानाने बंगालसमोर ३९० धावांचे लक्ष्य ठेवले होते. हे लक्ष्य पाहाता हरियानाणाचा विजय जवळपास पक्का मानला जात होता. कारण यापूर्वी महिलांच्या लिस्ट ए क्रिकेटमध्ये कोणीही एवढी मोठी धावसंख्या यशस्वी पार केली नव्हती. मात्र, बंगालने हार न मानता इतिहास घडवला.

## तनुष अश्विनची जागा घेणार

**मुंबई :** विजय हजारे ट्रॉफीत मुंबईला सोमवारी थरारक विजय मिळवून देणाऱ्या तनुष कोटियन याला ऑस्ट्रेलियासाठी बोलावणे आले आहे. आर. अश्विन याच्या निवृत्तीनंतर ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या उर्वरित दोन कसोटी सामन्यांसाठी कोटियन भारतीय संघाचा सदस्य असणार आहे. कोटियन हा अश्विनप्रमाणेच ऑफ स्पिनर आहे आणि फलंदाजीतही त्याचा खेळ कमालीचा आहे. त्याला रविवारी मेलबर्नसाठी रवाना होण्यासाठी तयार राहा, अशा सूचना केल्या गेल्या होत्या.

## ऋतुराजची नाबाद खेळी

**मुंबई :** विजय हजारे ट्रॉफी या स्पर्धेतील दुसऱ्या फेरीत महाराष्ट्र आणि सेनादल संघात सोमवारी सामना झाला. मुंबईत झालेल्या या सामन्यात महाराष्ट्राने सेनालदलवर ९ गडी राखत दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयात कर्णधार ऋतुराज गायकवाडने वादळी शतक करत मोलाचा वाटा उचलला. महाराष्ट्राचा हा सलग दुसरा विजय आहे. यावेळी ऋतुराज गायकवाडने ७४ चेंडूत १४८ धावांची नाबाद खेळी करत महाराष्ट्राच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

## मनू भाकरच्या वडीलांचा संताप

**नवी दिल्ली :** युवा नेमबाज मनू भाकर हिने पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके जिंकली होती. परंतु, तिची मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आलेली नाही. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश व्ही. रामासुब्रमणियम यांच्या अध्यक्षतेखालील १२ सदस्यीय निवड समितीने या पुरस्कारासाठी भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि पॅरा खेळाडू प्रवीण कुमार यांच्या नावाची शिफारस केली आहे. परंतु, देशातील या सर्वोच्च पुरस्कारासाठी मनू भाकरचे नाव नसल्याने तिच्या वडीलांनी संताप व्यक्त केला आहे.

### तब्बल २११ धावांनी विंडीजवर विजय

# भारतीय महिलांचा दणदणीत विजय

**। वडोदरा । वृत्तसंस्था ।**

**भारतीय महिला संघ आणि वेस्ट इंडीज महिला संघात रविवारी (दि.२२) एकदिवसीय मालिकेला सुरुवात झाली असून पहिला सामना वडोदरा येथे झाला. पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने दणक्यात विजय मिळवला आहे. भारताने या सामन्यात तब्बल २११ धावांनी विजय मिळवत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यात भारताने वेस्ट इंडीजसमोर ३१५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजला २६.२ षटकात सर्वबाद १०३ धावाच करता आल्या आहेत. भारताच्या या विजयात स्मृती मानधना आणि रेणुका सिंग ठाकूरने मोलाचा वाटा उचलला आहे.**





वेस्ट इंडीजने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. भारताने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकात ९ बाद ३१४ धावा केल्या होत्या. भारताकडून स्मृती मानधानाने १०२ चेंडूत सर्वोच्च ९१ धावांची खेळी केली. तसेच, हर्लिन देओलने ४४ धावांची, तर प्रतिका रावलने ४० धावांची खेळी केली. कर्णधार हरमनप्रीत कौरने ३४ धावांची, तर जेमिमा रोड्रिग्जने ३१ धावांची खेळी केली. तसेच, ऋचा घोषने २६ धावा केल्या. वेस्ट इंडीजकडून झायदा जेम्सने सर्वाधिक ५ बळी, हेली मॅथ्युजने २ बळी, तर डिएंड्रा डॉटीनने १ बळी घेतला.

वेस्ट इंडिकडून ३१५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना कर्णधार हेली मॅथ्युज आणि कियाना जोसेफ यांनी डावाची सुरुवात केली. पण या दोघीही शुन्यावर बाद झाल्या. कियाना पहिल्याच चेंडूवर धावबाद झाली, तर, मॅथ्युजला तिसऱ्याच षटकात रेणुका ठाकूरने बाद केले. रणूकाने डिएंड्रा डॉटीनलाही ८ धावांवर त्रिफळाचीत केले, कर रक्षदा विल्यम्सला १६ चेंडूत ३ धावांवर तितास साधूने त्रिफळाचीत केले. पाठोपाठ आलियाह एलियेन १३ धावांवर बाद धाली. तर, शेमिन कॅम्पबेल २१ धावांवर बाद झाली. त्यांनाही रेणुकानेच बाद केले. शबिका गजनबी (३) आणि झायदा जेम्सही (९) स्वस्तात बाद झाले. नंतर एफी फ्लेचर आणि करिष्मा रामहाराक यांनी झुंज दिली. परंतु, करिष्माला ११ धावांवर दीप्ती शर्माने बाद केले. त्यानंतरही शमिला कॉनेलला ८ धावांवर प्रिया मिश्राने बाद केले. एफी फ्लेचक २४ धावांवर नाबाद राहिली.

### स्मृतीचे सलग चौथे अर्धशतक

**या सामन्यात भारताकडून स्मृती मानधना आणि प्रतिका रावल यांनी डावाची सुरूवात केली. या दोघींनी एकमेकांना शानदार साथ देताना शतकी भागीदारी केली. त्यांनी ११० धावांची भागीदारी केली. यादरम्यान मानधनाने तिचे अर्धशतक पूर्ण केले होते. तिचे हे एकदिवसीय सामन्यातील २९ वे अर्धशतक असून तिने या वर्षात एकदिवसीय सामन्यांत ६५०हून अधिक धावा केल्या आहेत. तसेच, तिचे हे सलग चौथे अर्धशतक आहे. तिने वेस्ट इंडीजविरुद्ध याआधी झालेल्या तिन्ही टी-२० सामन्यातही अर्धशतक केले होते. मानधनाने या सामन्यात १०२ चेंडूत १३ चौकारांसह ९१ धावा ठोकल्या आहेत.**



### अलिबागमध्ये रंगणार

# क्रिकेटचा थरार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना अलिबाग शहर पुरस्कृत प्रशांत नाईक मित्र मंडळ आयोजित अलिबागमध्ये नव्या वर्षात नाईट टेनिस क्रिकेट लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेंचा थरारा ९ ते ११ जानेवारी दरम्यान अलिबाग शहरातील क्रीडा भुवन येथील मैदानात रंगणार आहे. या स्पर्धेसाठी १६ आमंत्रित संघाचा समावेश असणार असून या स्पर्धा अलिबाग तालुका मर्यादीत होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

गतवर्षापासून सुरु केलेल्या नाईट टेनिस क्रिकेट लीग स्पर्धेचे हे दुसरे पर्व आहे. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाला २ लाख रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला १ लाख रुपये व चषक तसेच, तृतीय व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी ५० रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. याचबरोबर स्पर्धेतील मालिकावीराला दुचाकी, उत्कृष्ट गोलंदाज व फलंदाजांना सायकल आणि विजेत्या व उपविजेत्या संघाला एलईडी टीव्ही देऊन सन्मानित केले जाणार आहे. ही स्पर्धा प्रो लिंक स्पोर्ट्स व एफएच स्पोर्ट्सवरदेखील घरबसल्या पहाता येणार आहे. २०२५ या नव्या वर्षात क्रिकेट खेळाडूंसाठी हक्काचे व्यासपिठ या स्पर्धेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे.

## रायगडच्या कराटेपटूंकडून पदकांची लयलुट

**। कोर्लई । वार्ताहर ।**

ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर आणि महाराष्ट्र अम्यॅचुअर स्पोर्ट्स कराटे असो.यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील दादर येथे राज्यस्तरीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत रायगडच्या कराटेपटूंनी ३ रजत, १० कांस्यपदके मिळवून चमकदार कामगिरी केली. त्यात राज्यभरातील अनेक कराटे संघटनांनी भाग घेतला होता. रायगड जिल्ह्यातील रसायनी व मजगाव-नांदगाव येथील शोरीन रियु कराटे डोच्या कराटेपटूंनी या स्पर्धेत एकूण १३ पदकांची कमाई केली आहे. त्यात शांभवी सावंत, त्रीशा गट्टू, खूशी शेटे यांनी रजत पदक पटकावले असून शर्वरी तांबडकर, ईश्वरी तांबडकर, स्वरूप जांभळे, आरंभ गणतांडेल, सई पाटील, वैदहि कुलकर्णी, अंश गहिरे, रेश्मा भोईर, काव्या नात्ती आणि आर्यन गद्रे यांनी कांस्यपदके पटकावली आहेत.



या सर्व कराटेपटूंना आंतरराष्ट्रीय पंच क्योशी विजय तांबडकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षक रेन्शी अभिषेक तांबडकर व सेन्सई आकांक्षा तांबडकर, सेंम्पाय स्वप्ना तांबडकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## अजिंक्यपद निवड चाचणीचे आयोजन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई शहर कबड्डी असो. च्या विद्यमाने जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे २५ डिसेंबर ते ३ जानेवारी दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. यात १४ वर्षाखालील मुले-मुली, स्थानिक पुरुष द्वितीय श्रेणी (ब) आणि तृतीय श्रेणी (क) गट, विशेषव्यावसायिक, व्यावसायिक अ आणि ब, व्यावसायिक महिला असे गट असून वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिर येथे या स्पर्धा खेळविण्यात येणार आहेत. तसेच, ज्या संलग्न संघाना उपरोक्त स्पर्धेत सहभाग घ्यायचा असेल त्यांनी आपले प्रवेश अर्ज व खेळाडूंची नोंदणी ऑलाईन पूर्ण करून आपला सहभाग नोंदवावा. त्याच बरोबर आपल्या विभागातील सहकारी संघांनही याची कल्पना द्यावी. हि प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून असो.ला सहकार्य करावे, असे आवाहन सचिव विश्वास मोरे यांनी केले आहे.

## पडसरे आश्रमशाळेची बक्षिसांची कमाई



**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

आदिवासी विभागाच्या प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा कर्जतमधील पिंगळस येथील शासकीय आश्रमशाळेत संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन पेणचे प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत जिल्ह्यातील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. या स्पर्धेत पडसरेनी आश्रमशाळेने उत्तम कामगिरी करत अनेक बक्षिसांची कमाई केली आहे.

या प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेत पडसरे आश्रमशाळेने कबड्डी मुली, रिले ४ बाय १००, गोळाफेक यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर, लांब उडी, २०० मीटर धावणे, ५ हजार मीटर चालणे यात द्वितीय क्रमांक आणि उंच उडीत तृतीय क्रमांक पटकावून घवघवित यश मिळविले आहे. प्रशिक्षक अनिल साजेकर तसेच शिक्षक राजू मोरे, दिपाली घरट, जाणू दोरे, मंगेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी केली.

## प्रीतम म्हात्रे चषकाचे आयोजन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्ष चिरनेरच्यावतीने ८ व ९ फेब्रुवारी रोजी चिरनेर येथील मातोश्री मैदानावर मर्यादित षटकांचे ओव्हरआर्म क्रिकेट सामने आयोजित करण्यात आले आहेत. याची माहिती शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते प्रशांत काळशेठ खारपाटील यांनी दिली आहे. तसेच, या स्पर्धेत विजेत्या क्रिकेट संघांना प्रीतम म्हात्रे चषक प्रदान करण्यात येणार आहे.

या क्रिकेट सामन्यांसाठी ६ हजार रुपये प्रवेश फी आकारण्यात आली असून प्रथम येणाऱ्या १६ संघांना प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच, हे सामने ५ षटकांचे खेळविले जाणार आहेत. या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या विजेत्या क्रिकेट संघाला ५० हजार रु. रोख रक्कम व चषक, तर द्वितीय क्रिकेट संघाला २५ हजार रु. रोख रक्कम व चषक देण्यात येणार आहे. तसेच, मालिकावीरासाठी कुलर देण्यात येणार असून उत्कृष्ट गोलंदाज व उत्कृष्ट फलंदाज यासाठी क्रिकेट शूज देण्यात येणार आहेत. या क्रिकेट स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी विवेक हातनोलकर (८१०८०८६५२६), दिनेश मोकल (८४५०९७६६६५), साईराज खारपाटील (८१८००२३३६६), नितीन म्हात्रे (९८९२०९४३८५) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रशांत खारपाटील यांनी केले आहे.

# धाक्सूद संघ ठरला अंतिमविजेता

**। कोलाड । वार्ताहर ।**

खांब विभागीय क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने रविवारी (दि.२२) गावदेवी बाहे यांच्यावतीने महिसदरा पत्राच्या किनाऱ्यावरील प्रांगणात क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील अंतिम सामना धाकसुद चिल्हे विरुद्ध धाक्सूद क्रीडा मंडळ चिल्हे संघ यांच्यात पार पडला. अटीतटीच्या या सामन्यात धाक्सूद चिल्हे संघाने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकवला आहे. तर, धाक्सूद क्रीडा मंडळ चिल्हे संघाला दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले आहे. तसेच, रॉयल किंग शिरवली संघ तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला आहे. यावेळी, चिल्हे संघाचा प्रज्योत लोखंडे उत्कृष्ट साम नावीर ठरला आहे. शिरवली संघाचा साहिल पोटफोडे हा स्पर्धेतील उकृष्ट गोलंदाज ठरला आहे. तर, शिरवली संघाचा राहुल पोटफोडने उत्कृष्ट फलंदाजाचा बहुमान पटकावला आहे.



दरम्यान, स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी लिंबाजी थिटे, सुभाष माठल, संतोष थिटे, प्रवीण थिटे हे उपस्थित होते. तर, स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ नरेंद्र माळी, अनंत थिटे, दयाराम भोईर, मंगेश चव्हाण, रुपेश बामुगडे, मंगेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.



# खरोशी शाळेचे घवघवीत यश

**। खरोशी । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती पेण यांच्या संयुक्त विद्यमाने खरोशी केंद्रातर्फे आयोजित क्रीडा व व्यक्तीमत्त्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सुयश मिळवून १४ बक्षीसे जिंकून केंद्रात अव्वल स्थान पटकावले आहे. स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा ज्योत पेटवून रायगड जिल्हा परिषदेचे उप शिक्षणाधिकारी सुनिल भोपळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या स्पर्धेत बेचकी, लंगडी, दोरी उडी, लगोरी, पारंपारिक नृत्य, समूहगीत गायन, शिल्पकला व पथनाट्य यांचा समावेश होता. यामध्ये खरोशी शाळेने बेचकीने नेम धरणे, शिल्पकला, समूहगान, पारंपारिक नृत्य, लगोरी, पथनाट्य व शून्य कचरा व्यवस्थापन या विविध स्पर्धांमध्ये लहान व मोठ्या गटात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावून घवघवीत यश प्राप्त केले आहे. यावेळी, बेलवडे सरपंच, ग्रामपंचायत सदस्या, वळक सरपंच, बळवली सरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य तसेच, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

### महाजनेत रंगला बैलगाडा शर्यतीचा थरार

# गोंडेकर बंधूंची बैलगाडी प्रथम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील महाजने ग्रामस्थ मंडळ आणि हौशी बैलगाडी मित्रंडळाच्यावतीने महाजने येथील माती बंदरामध्ये बैलगाडी शर्यतीचे आयोजन रविवारी (दि.२२) करण्यात आले होते. या स्पर्धेत रेवदंडा येथील गोंडेकर बंधूच्या बैलजोडीने फायनलच्या गटात प्रथम क्रमांक मिळवला आहे. यावेळी, बैलगाडा मालक गोंडेकर यांना आकर्षक बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी या बैलगाडा शर्यतीच्या थराराचा आनंद हजारो बैलगाडा हौशींनी घेतला.





या माती बंदरातील बैलगाडा शर्यतीमध्ये एकूण २१ गट तयार करण्यात आले होते. त्यात ३ गट घोडागाडी व १८ गट बैलगाडीचे तयार करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण १०३ बैलजोडींनी सहभाग घेतला होता. जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातील बैलगाडा मालक, चालकांसह बैलगाडा हौशींनी हजारोंच्या संख्येने सहभाग घेतला होता. या स्पर्धेला दुपारी तीननंतर सुरुवात झाली. यावेळी, आपला बैलगाडा प्रथम आणण्यासाठी गाडी चालक शर्थीचे प्रयत्न करीत होते. अखेर पंधराव्या म्हणजे फायनलच्या गटाचा बैलगाडा शर्यतीचा सामना रंगला. हा थरार पाहण्यासाठी बैलगाडा हौशींची अलोट गर्दी झाली होती. या गटात रेवदंडा येथील गोंडेकर बंधू, गोळबादेवी येथील अनुज पाटील, परहूरपाडा येथील दत्ताराम गुंजाळ यांच्या बैलगाडी जोडीने अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे.

या शर्यतीतील प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना आकर्षक बक्षीस ठेवण्यात आले होते. शर्यतीदरम्यान, पहिल्या गटापासून पंधरा गटापर्यंतच्या बैलगाडा, घोडागाडी शर्यतीचा आनंद प्रेक्षकांनी मनमुरादपणे लुटला. यावेळी महाजने ग्रामस्थ, हौशी बैलगाडी मित्रमंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)